भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# मुदत अधिनियम, १९६३

(सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ३६)

[दिनांक २० जून १९९१ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Limitation Act, 1963

## (Act No. 36 of 1963)

[*As in force on the 20th June 1991*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

१९९३

[किंमत ६ रुपये]

# मुदत अधिनियम, १९६३

(सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ३६)

# The Limitation Act, 1963

(Act No. 36 of 1963)

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २० जून १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला दि लिमिटेशन अॅक्ट, १९६३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड २, अंक २, दिनांक २० जून १९९१ यात पृष्ठ ४४२ ते ४६४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २० जून १९९१.

व्ही. एस. रमादेवी,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Limitation Act, 1963 as on the 20th June 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 2, dated 20th June 1991 on Pages 442 to 464.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 20th June 1991.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

## मुदत अधिनियम, १९६३

### विशोधन अधिनियमांची सूची

१. निरसन व विशोधन अधिनियम, १९६४ (१९६४ चा ५२).

२. मुदत (विशोधन) अधिनियम, १९६९ (१९६९ चा १०).

३. निरसन व विशोधन अधिनियम, १९७४ (१९७४ चा ५६).

# मुदत अधिनियम, १९६३

## (सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ३६)

### कलमांचा क्रम

कलमे


भाग एक

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

भाग दोन

दावे, अपिले व अर्ज यांची मुदत

३. मुदतीचा बाध.

४. न्यायालय बंद असताना विहित कालावधीची समाप्ती.

५. विवक्षित प्रकरणांत विहित कालावधी वाढवणे.

६. वैध निःसमर्थता.

७. अनेक व्यक्तींपैकी एका व्यक्तीची निःसमर्थता.

८. विशेष अपवाद.

९. मुदत सतत चालू राहणे.

१०. न्यासी व त्यांचे प्रतिनिधी यांच्याविरुद्ध दावे.

११. जेथे हा अधिनियम विस्तारित आहे त्या राज्यक्षेत्रांबाहेर केलेल्या संविदांवरून दावे.

भाग तीन

मुदतमर्यादेची गणना

१२. वैध कार्यवाहीत काळ वगळण्याबाबत.

१३. नादार म्हणून दावा लावण्याच्या किंवा अपील करण्याच्या अनुज्ञेसाठी अर्ज करण्यात आला असेल त्या प्रकरणी काही काळ वगळण्याबाबत.

१४. अधिकारिता नसलेल्या न्यायालयातील सद्‌भावपूर्ण कार्यवाहीचा काळ वगळणे.

१५. अन्य विवक्षित प्रकरणांत काळ वगळण्याबाबत.

१६. दावा दाखल करण्याचा अधिकार प्रोद्‌भूत झाल्यावर किंवा होण्यापूर्वी मृत्यू होण्याचा परिणाम.

१७. कपट किंवा चूकभूल याचा परिणाम.

१८. लेखी अभिस्वीकृतीचा परिणाम.

१९. ऋणाकारणे किंवा उत्तरदानावरील व्याजाकारणे भरणा केल्याचा परिणाम.

२०. अन्य व्यक्तीने दिलेल्या अभिस्वीकृतीचा किंवा केलेल्या भरण्याचा परिणाम.

२१. मूळच्या ऐवजी किंवा मूळच्या खेरीज आणखी नवीन वादी किंवा प्रतिवादी आणल्याचा परिणाम

२२. सतत चालू राहणारे भंग व अपकृती.

२३. विशेष नुकसान झाल्याशिवाय कारवाईयोग्य न होणाऱ्या कृतींबद्दल भरपाईसाठी दावे.

२४. संलेखांमध्ये उल्लेखिलेल्या कालाची गणना.

कलमे

## भाग चार

## कब्जाद्वारे मालकी संपादन करणे

२५. चिरभोगाद्वारे सुविधाधिकार संपादन करणे.

२६. अनुसेवी स्थावर ज्याच्याकडे परत जाणार त्याला अनुकूल अशाप्रकारे वगळणूक.

२७. संपत्तीवरील अधिकार नष्ट होणे.

## भाग पाच

## संकीर्ण

२८. [निरसित.]

२९. व्यावृत्ती.

३०. ज्यांकरिता विहित केलेला कालावधी हा 'भारतीय मुदत अधिनियम, १९०८' द्वारा विहित केलेल्या कालावधीहून कमी असेल असे दावे, इत्यादी करता उपबंध.

३१. मुदतबाह्य किंवा प्रलंबित दावे, इत्यादीच्या संबंधात उपबंध.

३२. [निरसित.]

अनुसूची—मुदतमर्यादा.

# मुदत अधिनियम, १९६३

## (सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ३६)

(५ ऑक्टोबर, १९६३)

**दावे व अन्य कार्यवाही यांची मुदत आणि यांच्याशी निगडीत असलेली प्रयोजने याबाबतचा कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम**

भारतीय गणराज्याच्या चौदाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**भाग एक**

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास 'मुदत अधिनियम, १९६३' असे म्हणावे. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून, संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[१], तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "अर्जदार" यांत पुढील व्यक्तींचा समावेश आहे :—

(एक) विनंतीअर्जदार;

(दोन) अर्ज करण्याचा स्वत:चा हक्क अर्जदाराला जिच्यापासून किंवा जिच्यामार्फत प्राप्त झाला असेल अशी कोणतीही व्यक्ती;

(तीन) अर्जदार हा मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक किंवा अन्य प्रतिनिधी म्हणून जिच्या संपदेचे प्रतिनिधित्व करत असेल अशी कोणतीही व्यक्ती;

(ख) "अर्ज" यात विनंतीअर्जाचा समावेश आहे;

(ग) "विनिमयपत्र" यात हुंडी व धनादेश यांचा समावेश आहे;

(घ) "बंधपत्र" यात, ज्याद्वारे एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला पैसे देण्यास स्वत:ला अशा शर्तींवर बांधून घेते की, विनिर्दिष्ट कृती करण्यात आली तर, किंवा, प्रकरणपरत्वे, करण्यात आली नाही तर, ते आबंधन शून्य होईल अशा कोणत्याही संलेखाचा समावेश आहे;

(ङ) "प्रतिवादी" यात पुढील व्यक्तींचा समावेश आहे :—

(एक) स्वत:विरुद्ध दावा लावला जाण्याचे दायित्व प्रतिवादीला जिच्यापासून किंवा जिच्यामार्फत प्राप्त झाले असेल अशी कोणतीही व्यक्ती;

(दोन) प्रतिवादी हा मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक किंवा अन्य प्रतिनिधी म्हणून जिच्या संपदेचे प्रतिनिधित्व करत असेल अशी कोणतीही व्यक्ती;

(च) "सुविधाधिकार" यात, संविदेतून निर्माण न होणाऱ्या ज्या हक्कामुळे एका व्यक्तीला दुसऱ्याच्या मालकीच्या मृदेचा काही अंश अथवा दुसऱ्याच्या जमिनीत वाढणारी, तिच्याशी संलग्न असणारी, तिच्यावर पोसली जाणारी कोणतीही गोष्ट काढून नेऊन स्वत:च्या लाभासाठी विनियोजित करण्याचा हक्क मिळतो त्याचा समावेश आहे;

(छ) "परकीय देश" याचा अर्थ भारताहून अन्य कोणताही देश असा आहे;

(ज) "सद्भाव"—योग्य काळजी घेऊन व लक्ष देऊन जी केलेली नाही अशी कोणतीही गोष्ट सद्भावपूर्वक केली असल्याचे मानण्यात येणार नाही;

(झ) "वादी" यात पुढील व्यक्तींचा समावेश आहे :—

(एक) दावा लावण्याचा स्वत:चा हक्क वादीला जिच्यापासून किंवा जिच्यामार्फत प्राप्त झाला असेल अशी कोणतीही व्यक्ती;

(दोन) वादी हा मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक किंवा अन्य प्रतिनिधी म्हणून जिच्या संपदेचे प्रतिनिधित्व करत असेल अशी कोणतीही व्यक्ती;

(ञ) "मुदतमर्यादा" याचा अर्थ कोणताही दावा, अपील किंवा अर्ज यांकरता अनुसूचीद्वारे विहित केलेली मुदतमर्यादा असा आहे, आणि "विहित कालावधी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या उपबंधांनुसार गणना केलेली मुदतमर्यादा असा आहे;

---

[१] १ जानेवारी १९६४, अधिसूचना क्र. का. आ. ८०/३११८, दिनांक २९ ऑक्टोबर १९६३, द्वारा भारताचे राजपत्र, भाग-२, खंड (३) (दोन), पृष्ठ ३११८ पहा.

(ट) "वचनचिठ्ठी" याचा अर्थ, ज्या संलेखाचा कर्ता त्यात नेमून दिलेल्या कालमर्यादेत केव्हाही किंवा मागणी झाल्याबर किंवा तो संलेख दाखवण्यात आल्यावर दुसऱ्या व्यक्तीला पैशांची विनिर्दिष्ट रक्कम देण्यास स्वत:ला बिनशर्त बांधून घेतो असा कोणताही संलेख असा आहे;

(ठ) "दावा". यात अपील किंवा अर्ज याचा समावेश नाही;

(ड्) "अपकृती" याचा अर्थ जे केवळ संविदाभंगाच्या किंवा न्यासभंगाच्याच स्वरूपाचे नाही असे दिवाणीपात्र अपकृत्य असा आहे;

(ढ्) "न्यासी" यात, बेनामीदार, गहाण फिटल्यानंतरही कब्जा चालू ठेवणारा गहाण-धारक किंवा स्वत्वाधिकार नसताना गैर कब्जा धारण करणारी व्यक्ती यांचा समावेश नाही.

## भाग दोन

## दावे, अपिले व अर्ज यांची मुदत

मुदतीचा बाध.

३. (१) कलम ४ ते २४ (दोन्ही धरून) यांमध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, विहित कालावधीनंतर दाखल केलेला प्रत्येक दावा, दाखल केलेले अपील आणि केलेला अर्ज हा, बचावात मुदतीची तक्रार पुढे मांडलेली नसली तरीही, फेटाळण्यात येईल.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ,—

(क्) (एक) सर्वसामान्य बाबतीत, जेव्हा दावाअर्ज योग्य अधिकाऱ्यापुढे सादर केला जातो तेव्हा;

(दोन) नादाराच्या बाबतीत, जेव्हा नादार म्हणून दावा लावण्याच्या परवानगीसाठी तो अर्ज करतो तेव्हा; आणि

(तीन) न्यायालयाकरवी जी कंपनी गुंडाळली जात आहे तिच्याविरुद्ध मागणी करण्यात आल्यास त्या बाबतीत, जेव्हा मागणीदार शासकीय समापकाकडे पहिल्याप्रथम आपली मागणी पाठवतो तेव्हा;

दावा दाखल केला असे होते;

(ख्) वजावट म्हणून किंवा प्रतिमागणी म्हणून केलेली कोणतीही मागणी म्हणजे स्वतंत्र दावा समजण्यात येईल आणि,—

(एक) वजावटीच्या बाबतीत, ज्या दाव्यात वजावटीचे प्रतिकथन करण्यात आले असेल तो लावला त्या दिनांकास,

(दोन) प्रतिमागणीच्या बाबतीत, ज्या दिनांकास न्यायालयात प्रतिमागणीचे प्रतिकथन करण्यात आले असेल त्या दिनांकास,

तो दावा दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(ग्) उच्च न्यायालयात चालनाच्या नोटिशीद्वारे करावयाचा अर्ज जेव्हा त्या न्यायालयाच्या योग्य अधिकाऱ्यांकडे सादर केला जातो तेव्हा तो अर्ज केला गेला असे ठरते.

न्यायालय बंद असताना विहित कालावधीची समाप्ती.

४. कोणत्याही दाव्यासाठी, अपिलासाठी किंवा अर्जासाठी विहित केलेला कालावधी जर न्यायालय बंद असल्याच्या दिवशी संपत असेल तर, न्यायालय पुन्हा उघडेल त्या दिवशी दावा दाखल करता येईल, अपील दाखल करता येईल किंवा अर्ज करता येईल.

**स्पष्टीकरण.**—न्यायालय जर त्याच्या नेहमीच्या कामाच्या वेळांत केव्हाही बंद राहिले तर, तशा कोणत्याही दिवशी या कलमाच्या अर्थानुसार ते बंद असल्याचे मानले जाईल.

विवक्षित प्रकरणांत विहित कालावधी वाढविणे.

५. 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५)—आदेश एकवीसच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाखाली केलेल्या अपिलाहून किंवा अर्जाहून अन्य असे कोणतेही अपील किंवा अर्ज विहित कालावधीनंतर करण्यात आल्यास, अशा कालावधीच्या आत अपील दाखल न करण्यास किंवा अर्ज न करण्यास आपणांस पुरेसे कारण होते अशी जर अपीलकर्त्याने किंवा अर्जदाराने न्यायालयाची खात्री करून दिली तर, ते अपील किंवा तो अर्ज स्वीकारता येईल.

**स्पष्टीकरण.**—विहित कालावधी ठरवताना किंवा मोजताना अपीलकर्त्याची किंवा अर्जदाराची उच्च न्यायालयाच्या कोणत्याही आदेशामुळे, प्रथेमुळे किंवा न्यायनिर्णयामुळे दिशाभूल झाली हे तथ्य या कलमाच्या अर्थानुसार पुरेसे कारण होऊ शकेल.

वैध नि:समर्थता.

६. (१) दावा दाखल करण्यास किंवा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दरखास्त (अर्ज) देण्यास हक्कदार असलेली व्यक्ती, विहित कालावधी मोजावयाचा त्यावेळी अज्ञान किंवा भ्रमिष्ट किंवा निर्बुद्ध असेल तर, ती नि:समर्थता संपल्यापासून त्या व्यक्तीला, एरव्ही अनुसूचीच्या तिसऱ्या स्तंभात त्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या वेळेपासून जितका कालावधी मिळाला असता तितक्याच कालावधीत तो दावा दाखल करता येईल किंवा ती दरखास्त देता येईल.

(२) ज्यां वेळेपासून विहित कालावधी मोजावयाचा त्यावेळी अशा व्यक्तीच्या ठायी अशा दोन प्रकारच्या निःसमर्थता असतील तर, अथवा तिची एका प्रकारची निःसमर्थता संपण्यापूर्वी तिच्या ठायी दुसऱ्या प्रकारची निःसमर्थता निर्माण झाली असेल तर, दोन्ही निःसमर्थता संपल्यापासून त्या व्यक्तीला एरव्ही अशा विनिर्दिष्ट वेळेपासून जितका कालावधी मिळाला असता तितक्याच कालावधीत तो दावा दाखल करता येईल किंवा ती दरखास्त देता येईल.

(३) त्या व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत निःसमर्थता तशीच चालू राहिल्यास, तिचा मृत्यू झाल्यापासून तिच्या वैध प्रतिनिधीला, एरव्ही अशा विनिर्दिष्ट वेळेपासून जितका कालावधी मिळाला असता तितक्याच कालावधीत तो दावा दाखल करता येईल किंवा ती दरखास्त देता येईल.

(४) पोटकलम (३) मध्ये निर्देशलेला वैध प्रतिनिधी जिचे प्रतिनिधित्व करतो त्या व्यक्तीच्या मृत्यूच्या दिनांकास त्याच्या ठायी अशी कोणतीही निःसमर्थता असेल तर, पोट-कलमे (१) व (२) यांमधील नियम लागू होतील.

(५) निःसमर्थ असलेली व्यक्ती निःसमर्थता संपल्यानंतर, पण या कलमाखाली तिला देण्यात आलेल्या कालावधीत मृत्यू पावली असेल तेव्हा, तिचा मृत्यू झाल्यापासून तिच्या वैध प्रतिनिधीला, ती व्यक्ती मृत्यू पावली नसती तर तिला एरव्ही जितका कालावधी मिळाला असता तितक्याच कालावधीत तो दावा दाखल करता येईल किंवा ती दरखास्त देता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "अज्ञान" यात गर्भस्थ अपत्याचा समावेश होतो.

**अनेक व्यक्तींपैकी एका व्यक्तीची निःसमर्थता.**

७. जेथे दावा दाखल करण्यास किंवा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दरखास्त देण्यात संयुक्तपणे हक्कदार असलेल्या अनेक व्यक्तींपैकी एखाद्या व्यक्तीच्या ठायी अशी कोणतीही निःसमर्थता असून अशा व्यक्तींच्या सहमतीशिवाय दायित्वमुक्ती देणे शक्य असेल तेथे, त्या सर्वाविरुद्ध मुदत सुरू होईल, पण जर अशी दायित्वमुक्ती देता येत नसेल तर, त्यांच्यापैकी एकजण इतरांच्या सहमतीशिवाय अशी दायित्वमुक्ती देण्यास सक्षम होईपर्यंत किंवा निःसमर्थता संपेपर्यंत त्यांच्यापैकी कोणाच्याही विरुद्ध मुदत सुरू होणार नाही.

**स्पष्टीकरण एक.**—कोणत्याही स्थावर संपत्तीसंबंधातील दायित्वासह प्रत्येक प्रकारच्या दायित्वाला हे कलम लागू आहे.

**स्पष्टीकरण दोन.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, मिताक्षरा कायद्याद्वारे नियंत्रित होणाऱ्या हिंदू अविभक्त कुटुंबाचा कर्ता हा जर एकत्र कुटुंबाच्या संपत्तीचा व्यवस्थापक असेल तरच कुटुंबातील अन्य सदस्यांच्या सहमतीशिवाय दायित्वमुक्ती देण्यास तो सक्षम असल्याचे मानले जाईल.

**विशेष अपवाद.**

८. कलम ६ किंवा कलम ७ मधील कोणतीही गोष्ट अग्रक्रयहक्क बजावून घेण्यासाठी लावलेल्या दाव्यांना लागू होत नाही, अथवा तीमुळे कोणत्याही दाव्याचा किंवा अर्जाचा कालावधी निःसमर्थता संपल्यापासून किंवा जिच्या ठायी ती निःसमर्थता असेल त्या व्यक्तीच्या मृत्यूपासून तीन वर्षांहून अधिक काळपर्यंत वाढतो असे मानले जाणार नाही.

**मुदत सतत चालू राहणे.**

९. एकदा मुदत सुरू झाली की, दावा दाखल करण्याबाबत किंवा अर्ज करण्याबाबत मागाहून निर्माण झालेली कोणतीही निःसमर्थता किंवा असमर्थता ती थांबवू शकणार नाही :

परंतु, धनकोच्या संपदेचे प्रशासनपत्र त्याच्या ऋणकोला देण्यात आले असेल तेथे, ऋण-वसुलीच्या दाव्याची सुरू झालेली मुदत प्रशासन चालू असेतोपर्यंत स्थगित राहील.

**न्यासी व त्यांचे प्रतिनिधी यांच्याविरुद्ध दावे.**

१०. या अधिनियमातील पूर्वगामी उपबंधात काहीही अंतर्भूत असले तरीही, जिच्या ठायी एखाद्या विशिष्ट योजनापुरती न्यास म्हणून मालमत्ता निहित झाली असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा तिच्या वैध प्रतिनिधींच्या किंवा अभिहस्तांकितीच्या (मूल्यवान प्रतिफलाच्या बदल्यात ते अभिहस्तांकिती झाले नसतील तर,) हाती असलेली अशी संपत्ती किंवा तीपासूनची आवक यांचा पाठपुरावा करण्यासाठी अथवा अशा संपत्तीचा किंवा आवकेचा हिशेब घेण्यासाठी त्यांच्याविरुद्ध लावावयाच्या कोणत्याही दाव्याला कितीही काळ लोटला तरी मुदतीचा बाध येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ हिंदू, मुस्लीम किंवा बौद्ध यांच्या धार्मिक अथवा धर्मादाय दाननिधीमध्ये समाविष्ट असलेली कोणतीही संपत्ती विशिष्ट प्रयोजनापुरती न्यास म्हणून निहित झालेली संपत्ती असल्याचे मानले जाईल आणि त्या संपत्तीचा व्यवस्थापक हा तिचा न्यासी असल्याचे मानले जाईल.

**जेथे हा अधिनियम विस्तारित आहे त्या राज्यक्षेत्राबाहेर केलेल्या संविदावरून दावे.**

११. (१) जम्मू व काश्मीर राज्यांत किंवा एखाद्या परकीय देशात केलेल्या संविदांवरून, या अधिनियमाचा विस्तार असलेल्या राज्यक्षेत्रांमध्ये दाखल केले जाणारे दावे या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या मुदतविषयक नियमांस अधीन असतील.

(२) जम्मू व काश्मीर राज्यात किंवा एखाद्या परकीय देशात केलेल्या संविदेवरून उक्त राज्य-क्षेत्रात दाखल केलेल्या दाव्यांमध्ये—

(क) त्या राज्यात किंवा परकीय देशात अमलात असलेल्या नियमामुळे संविदेचे अस्तित्व संपले आहे; आणि

(ख) अशा नियमाने विहित केलेल्या कालावधीत पक्षकार त्या राज्यात किंवा त्या परकीय देशात अधिवासी होते,

असे असल्याशिवाय तो नियम बचाव म्हणून देता येणार नाही.

## भाग तीन

## मुदतमर्यादेची गणना

**वैध कार्यवाहीत काळ वगळण्याबाबत.**

१२. (१) कोणत्याही दाव्याच्या, अपिलाची किंवा अर्जाची मुदतमर्यादा मोजताना, ज्या दिवसापासून असा अवधी मोजावयाचा तो दिवस वगळला जाईल.

(२) अपील अगर अपिलास परवानगी मिळण्यासाठी अथवा न्यायनिर्णयाच्या पुनरीक्षणासाठी किंवा पुनर्विलोकनासाठी करावयाचा अर्ज यांची मुदतमर्यादा मोजताना, ज्याविरुद्ध तक्रार करण्यात आली असेल तो न्यायनिर्णय ज्या दिवशी घोषित करण्यात आला तो दिवस आणि ज्यावर अपील करण्यात आले आहे किंवा ज्याच्या पुनरीक्षणाची किंवा पुनर्विलोकनाची मागणी करण्यात आली आहे त्या हुकूमनाम्याची, शिक्षादेशाची किंवा आदेशाची नक्कल मिळविण्यासाठी लागणारा काळ वगळण्यात येईल.

(३) जेव्हा हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर अपील करण्यात आले असेल अथवा त्याच्या पुनरीक्षणाची किंवा पुनर्विलोकनाची मागणी करण्यात आली असेल तेव्हा, अथवा जेव्हा हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर अपील करण्याच्या परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, ज्या न्यायनिर्णयावर तो हुकूमनामा किंवा आदेश आधारलेला आहे त्याची नक्कल मिळण्यासाठी लागणारा काळही वगळण्यात येईल.

(४) लवाद-निवाडा रद्द ठरवण्यासाठी अर्ज करण्याची मुदतमर्यादा मोजताना, निवाड्याची नक्कल मिळवण्यासाठी लागणारा काळ वगळण्यात येईल.

*स्पष्टीकरण.*—हुकूमनाम्याची किंवा आदेशाची नक्कल मिळवण्यासाठी लागणारा कालावधी या कलमानुसार मोजताना, हुकूमनाम्याची किंवा आदेशाची नक्कल मिळवण्यासाठी अर्ज केला जाण्यापूर्वी न्यायालयाने तो तयार करण्यासाठी घेतलेला वेळ वगळला जाणार नाही.

**नादार म्हणून दावा लावण्याचा किंवा अपील करण्याच्या अनुज्ञेसाठी अर्ज करण्यात आला असेल भरण्यात त्या प्रकरणी काळ वगळण्याबाबत.**

१३. नादार म्हणून दावा लावण्याच्या किंवा अपील करण्याच्या अनुज्ञेसाठी अर्ज करण्यात येऊन तो फेटाळण्यात आला असेल अशा कोणत्याही प्रकरणी, कोणत्याही दाव्यासाठी किंवा अपिलासाठी विहित केलेली मुदतमर्यादा मोजताना, अशा अनुज्ञेसाठी केलेला अर्ज ज्या काळात त्याने सद्भावपूर्वक चालवला असेल तो काळ वगळण्यात येईल, आणि अशा दाव्यासाठी किंवा अपिलासाठी विहित केलेली न्यायालय-फी भरण्यात आल्यानंतर न्यायालयाला, जणू काही सुरुवातीलाच न्यायालय-फी भरलेली असावी त्याप्रमाणे त्या प्रकरणी काही तो दावा किंवा ते अपील तितकेच प्रभावी व परिणामकारक आहे असे समजून चालवता येईल.

**अधिकारिता नसलेल्या न्यायालयातील सद्भावपूर्ण कार्यवाहीचा काळ वगळणे.**

१४. (१) कोणत्याही दाव्याची मुदतमर्यादा मोजताना, जर वादीने प्रतिवादीविरुद्ध यथायोग्य तत्परतेने दुसरी दिवाणी कार्यवाही चालवली असेल—मग ती प्रारंभिक न्यायालयात असो वा अपिलाच्या किंवा पुनरीक्षणाच्या न्यायालयात असो आणि ती कार्यवाही त्याच वादग्रस्त बाबीशी संबंधित असून ती विचारात घेण्यास अधिकारितेतील उणिवेमुळे किंवा तशाच स्वरूपाच्या अन्य कारणामुळे अक्षम असलेल्या न्यायलयात चालवली गेली असेल तर, त्या कार्यवाहीचा काळ वगळण्यात येईल.

(२) कोणत्याही अर्जाची मुदतमर्यादा मोजताना, जर अर्जदाराने त्याच पक्षाविरुद्ध त्याच अनुतोषासाठी यथायोग्य तत्परतेने दुसरी दिवाणी कार्यवाही चालवली असेल—मग ती प्रारंभिक न्यायालयात असो वा अपिलाच्या किंवा पुनरीक्षणाच्या न्यायालयात असो—आणि अशी कार्यवाही विचारात घेण्यास अधिकारितेतील उणिवेमुळे किंवा तशाच स्वरूपाच्या अन्य कारणामुळे अक्षम असलेल्या न्यायालयात ती चालवली गेली असेल तर, त्या कार्यवाहीचा काळ वगळण्यात येईल.

(३) 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) आदेश तेवीसच्या नियम २ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयाच्या अधिकारितेतील उणिवेमुळे किंवा तशाच स्वरूपाच्या अन्य कारणामुळे पहिला दावा निष्फळ होणार या कारणावरून नवीन दावा दाखल करण्यास त्या आदेशातील नियम १ खाली परवानगी दिलेली असता त्या परवानगीच्या आधारे दाखल केलेल्या नवीन दाव्याच्या संबंधात पोटकलम (१) चे उपबंध लागू होतील.

*स्पष्टीकरण.*—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) ज्या काळात पूर्वीची दिवाणी कार्यवाही प्रलंबित होती तो काळ वगळताना, ज्या दिवशी ती कार्यवाही सुरू करण्यात आली तो दिवस आणि ज्या दिवशी ती समाप्त झाली तो दिवस असे दोन्ही दिवस मोजले जातील;

(ख) अपिलास विरोध करणारा वादी किंवा अर्जदार हा कार्यवाही चालवणारा असल्याचे मानले जाईल;

(ग) पक्षकारांचे किंवा वादकारणांचे अपसंयोजन हे अधिकारितेच्या उणिवेसारखेच कारण असल्याचे मानले जाईल.

*अन्य विवक्षित प्रकरणात काळ वगळण्याबाबत.*

१५. (१) जो कोणताही दावा सुरू करण्याचे किंवा ज्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचे काम व्यादेशाद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थगित झालेले असेल त्या दाव्याची मुदतमर्यादा किंवा त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दिलेल्या दरखास्तीची मुदतमर्यादा मोजताना, व्यादेशाचा किंवा आदेशाचा अंमल चालू असण्याचा काळ, तसेच ज्या दिवशी तो काढण्यात आला किंवा देण्यात आला तो दिवस आणि ज्या दिवशी तो मागे घेण्यात आला तो दिवस वगळला जाईल.

(२) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या आवश्यकतांनुसार ज्याची नोटीस देण्यात आली आहे अथवा ज्यासाठी शासनाची किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाची पूर्वसंमती किंवा मंजुरी आवश्यक आहे अशा कोणत्याही दाव्याची मुदतमर्यादा मोजताना, अशा नोटिशीचा कालावधी अथवा, प्रकरणपरत्वे, अशी संमती किंवा मंजुरी मिळवण्यासाठी लागणारा काळ वगळला जाईल.

**स्पष्टीकरण.**—शासनाची किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाची संमती किंवा मंजुरी मिळवण्यासाठी लागणारा काळ वगळताना, संमती किंवा मंजुरी मिळवण्यासाठी ज्या दिवशी अर्ज केला तो दिवस आणि शासनाचा किंवा अन्य प्राधिकरणाचा आदेश ज्या दिवशी मिळाला तो दिवस असे दोन्ही दिवस मोजण्यात येतील.

(३) एखाद्या व्यक्तीला दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत करण्याच्या कार्यवाहीत नियुक्त केलेल्या कोणत्याही प्रापकाने किंवा अंतरिम प्रापकाने अथवा एखादी कंपनी गुंडाळण्याच्या कार्यवाहीत नियुक्त केलेल्या कोणत्याही समापकाने किंवा तात्पुरत्या समापकाने लावावयाच्या दाव्याची मुदतमर्यादा किंवा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी द्यावयाच्या दरखास्तीची मुदतमर्यादा मोजताना, अशी कार्यवाही सुरू केल्याच्या दिनांकापासून सुरू होणारा आणि अशा प्रापकाच्या किंवा प्रकरणपरत्वे, समापकाच्या नियुक्तीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या अखेरीस संपणारा कालावधी वगळण्यात येईल.

(४) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या विक्रीतील खरेदीदाराने कब्जासाठी लावावयाच्या दाव्याची मुदतमर्यादा मोजताना, विक्री रद्द ठरवण्यासाठी ज्या काळात कार्यवाही चालवण्यात आली असेल तो काळ वगळला जाईल.

(५) कोणत्याही दाव्याची मुदतमर्यादा मोजताना, प्रतिवादी ज्या काळात भारताच्या बाहेर आणि भारताबाहेरील जी राज्यक्षेत्रे केंद्र शासनाच्या प्रशासनाखाली असतील त्याबाहेर राहिला असेल तो काळ वगळला जाईल.

*दावा दाखल करण्याचा अधिकार प्रोद्भूत झाल्यावर किंवा होण्यापूर्वी मृत्यू होण्याचा परिणाम.*

१६. (१) जी व्यक्ती ह्यात असती तर दावा दाखल करण्याचा किंवा अर्ज करण्याचा हक्क तिला मिळाला असता ती व्यक्ती तो हक्क प्रोद्भूत होण्यापूर्वी मृत्यू पावली तर, अथवा दावा दाखल करण्याचा किंवा अर्ज करण्याचा एखादया व्यक्तीचा मृत्यू झाल्यावरच प्रोद्भूत होणारा असेल तर असा दावा दाखल करण्यास किंवा असा अर्ज करण्यास सक्षम असा मृताचा वैध प्रतिनिधी त्या जागी येईल त्या वेळेपासून मुदतमर्यादा मोजली जाईल.

(२) जी व्यक्ती ह्यात असती तर तिच्याविरुद्ध दावा दाखल करण्याचा किंवा अर्ज करण्याचा हक्क प्रोद्भूत झाला असता ती व्यक्ती तो हक्क प्रोद्भूत होण्यापूर्वी मृत्यू पावली तर, अथवा एखाद्या व्यक्तीविरुद्ध दावा दाखल करण्याचा किंवा अर्ज करण्याचा हक्क अशा व्यक्तीचा मृत्यू झाल्यावरच प्रोद्भूत होणारा असेल तर ज्याच्याविरुद्ध वादीला असा दावा दाखल करता येईल किंवा अर्ज करता येईल असा मृताचा वैध प्रतिनिधी त्या जागी येईल त्या वेळेपासून मुदतमर्यादा मोजली जाईल.

(३) अग्रक्रयहक्क बजावण्यासाठी लावल्या जाणाऱ्या दाव्यांना अथवा स्थावर संपत्तीच्या किंवा वंशपरंपरापदाच्या कब्जासाठी लावल्या जाणाऱ्या दाव्यांना पोट-कलम (१) मधील किंवा पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट लागू नाही.

*कपट किंवा चूकभूल याचा परिणाम.*

१७. (१) ज्यासाठी या अधिनियमाद्वारे मुदतमर्यादा विहित केली आहे अशा कोणत्याही दाव्याच्या किंवा अर्जाच्या बाबतीत जर,—

(क) प्रतिवादीचे किंवा उत्तरवादीचे किंवा त्याच्या अभिकर्त्याचे कपट या कारणावर दावा किंवा अर्ज आधारित असेल तर; किंवा

(ख) दावा किंवा अर्ज ज्यावर आधारित आहे अशा हक्काचे किंवा स्वत्वाधिकाराचे ज्ञान कोणत्याही व्यक्तीच्या कपटामुळे गुप्त राहिले असेल तर; किंवा

(ग) दावा किंवा अर्ज चूकभुलीच्या परिणामांबद्दल अनुतोष मिळवण्यासाठी केलेला असेल तर; किंवा

(घ) वादीचा किंवा अर्जदाराचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असलेला कोणताही दस्तऐवज त्याच्यापासून कपटीपणाने लपवलेला असेल तर,

त्यावेळी कपट किंवा चूकभूल वादीच्या किंवा अर्जदाराच्या लक्षात येईल अथवा त्याने वाजवी तत्परता दाखवली असती तर ज्यावेळी ते त्याच्या लक्षात आले असते अथवा लपवलेल्या दस्तऐवजाच्या बाबतीत लपवलेला दस्तऐवज हजर करण्याची किंवा हजर करवण्याची साधने वादीला किंवा अर्जदाराला पहिल्या प्रथम ज्यावेळी उपलब्ध झाली असतील त्या वेळेपर्यंत मुदत सुरू होणार नाही :

परंतु जर एखादी संपत्ती,—

(एक) कपटाच्या बाबतीत, कपटात जी सामील नव्हती अशा व्यक्तीने मूल्यवान प्रतिफलदाखल खरेदी केलेली असून, काही कपट करण्यात आले आहे हे खरेदीच्या वेळी तिला माहीत नसेल किंवा तसे समजण्यास तिला कारण नसेल तर, किंवा

(दोन) चूकभुलीच्या बाबतीत, ज्या संव्यवहारात चूकभूल झाली ती झाल्यानंतर एखाद्या व्यक्तीने अशी चूकभूल झाली होती हे माहीत नसताना किंवा तसे समजण्यास कारण नसताना मूल्यवान प्रतिफलादाखल खरेदी केलेली असेल तर, किंवा

(तीन) लपवलेल्या दस्तऐवजाच्या बाबतीत, अशा व्यक्तीकडून लपवणुकीत जी सामील नव्हती अशा व्यक्तीने मुल्यवान प्रतिफलादाखल खरेदी केलेली असून दस्तऐवज लपवण्यात आला हे खरेदीच्या वेळी तिला माहीत नसेल किंवा तसे समजण्यास तिला कारण नसेल तर,

ती संपत्ती परत मिळवण्यासाठी किंवा तीवरील प्रभार बजावून घेण्यासाठी अथवा तिच्यावर परिणाम करणारा संव्यवहार रद्द ठरवण्यासाठी दावा लावणे किंवा अर्ज करणे या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे शक्य होणार नाही.

(२) निर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीस कपटपूर्वक किंवा बलप्रयोगाने प्रतिबंध केला असेल त्या बाबतीत, उक्त कालावधी संपल्यानंतर निर्णीत धनकोने केलेल्या अर्जावरून न्यायालयाला हुकूमनामा किंवा आदेश यांच्या अंमलबजावणीचा अवधी वाढवता येईल :

परंतु, कपट उघडकीला आल्याच्या किंवा बलप्रयोग थांबल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत असा अर्ज केलेला असला पाहिजे.

लेखी अभिस्वीकृतीचा परिणाम.

१८. (१) जर कोणतीही संपत्ती किंवा अधिकार यांच्या संबंधातील दाव्यासाठी किंवा अर्जासाठी विहित केलेला कालावधी संपण्यापूर्वी, ज्याच्याविरुद्ध अशी संपत्ती किंवा अधिकार यांची मागणी करण्यात आली आहे अशा पक्षाने अथवा त्याला जिच्यामार्फत आपला हक्क किंवा दायित्व प्राप्त झाले आहे त्या व्यक्तीने अशा संपत्तीच्या किंवा अधिकाराच्या संबंधातील दायित्वाबाबत आपल्या स्वाक्षरीनिशी लेखी अभिस्वीकृती दिली असेल तर, अभिस्वीकृती याप्रमाणे स्वाक्षरित करण्यात आली त्या वेळेपासून नव्याने मुदतमर्यादा मोजली जाईल.

(२) अभिस्वीकृती अंतर्भूत असलेल्या लेखावर दिनांक नसेल तर, ती केव्हा स्वाक्षरित करण्यात आली त्या वेळेबाबत तोंडी पुरावा देता येईल, पण 'भारतीय पुरावा अधिनियम १८७२' (१८७२ चा १) याच्या उपबंधांच्या अधीनतेने, त्या लेखातील मजकुराचा तोंडी पुरावा स्वीकृत केला जाणार नाही.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) अभिस्वीकृतीमध्ये त्या संपत्तीचे किंवा अधिकाराचे नेमके स्वरूप विनिर्दिष्ट केलेले नसले अथवा भरणा करण्याची, सुपूर्दगीची, पालनाची किंवा उपभोगाची वेळ अजून आलेली नाही असे प्रकथन केलेले असले, अथवा अभिस्वीकृतीसोबत, भरणा करण्यास, सुपूर्दगी करण्यास, पालन करण्यास किंवा उपभोगाला परवानगी देण्यास नकार देण्यात आलेला असला, अथवा तीसोबत वजावटीची मागणी जोडलेली असली, अथवा ती अभिस्वीकृत संपत्तीस किंवा हक्कदार असलेल्या किंवा एखादा हक्क असलेल्या व्यक्तीहून अन्य व्यक्तीला उद्देशून असली तरीही पुरेशी होऊ शकेल;

(ख) "स्वाक्षरित" या शब्दाचा अर्थ, स्वतः किंवा या संबंधात रीतसर प्राधिकृत झालेल्या अभिकर्त्याने स्वाक्षरित केलेला असा आहे; आणि

(ग) हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी केलेला अर्ज हा कोणत्याही संपत्तीसंबंधीचा किंवा अधिकारासंबंधीचा अर्ज असल्याचे मानले जाणार नाही.

ऋणाकारणे किंवा उत्तरदानावरील व्याजाकारणे भरणा केल्याचा परिणाम.

१९. जेव्हा एखादे ऋण किंवा उत्तरदान फेडण्यास दायी असलेल्या व्यक्तीने किंवा यासंबंधात रीतसर प्राधिकृत झालेल्या तिच्या अभिकर्त्याने विहित कालावधी संपण्यापूर्वी त्या ऋणाकारणे किंवा उत्तरदानावरील व्याजावरील भरणा केला असेल तेव्हा, भरणा करण्यात आला त्या वेळेपासून नव्याने मुदतमर्यादा मोजली जाईल :

परंतु १ जानेवारी, १९२८ पूर्वी व्याजाचा भरणा झाला असल्यास ती बाब खेरीजकरून, भरण्याबाबतची अभिस्वीकृती भरणा करणाऱ्या व्यक्तीच्या हस्ताक्षरात असल्याचे किंवा तिने स्वाक्षरित केलेल्या लेखामध्ये अंतर्भूत असल्याचे दिसले पाहिजे.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) जेथे गहाण जमीन गहाणधारकाच्या कब्जात असेल तेथे, अशा जमिनीचे भाडे किंवा उपज याची प्राप्ती म्हणजे भरणा असल्याचे मानले जाईल;

(ख) "ऋण" यात न्यायालयाच्या हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली देय असलेले पैसे अंतर्भूत नाहीत.

२०. (१) १८ आणि १९ या कलमांतील "यासंबंधात रीतसर प्राधिकृत झालेला अभिकर्ता" या शब्दप्रयोगात, निःसमर्थ व्यक्तीच्या बाबतीत, तिचा कायदेशीर पालक, सुपूर्ददार किंवा व्यवस्थापक अथवा अभिस्वीकृती स्वाक्षरित करण्यासाठी किंवा भरणा करण्यासाठी अशा पालकाने, सुपूर्ददाराने किंवा व्यवस्थापकाने रीतसर प्राधिकृत केलेला अभिकर्ता अंतर्भूत असेल. अन्य व्यक्तीने दिलेल्या अभिस्वीकृतीचा किंवा केलेल्या भरण्याचा परिणाम.

(२) अनेक संयुक्त संविदाकार, भागीदार, मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा गहाणधारक यांपैकी एकजण उक्त कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे त्यांच्यापैकी अन्य कोणत्याही व्यक्तीने किंवा अन्य व्यक्तीने किंवा तिच्या अगर त्यांच्या अभिकर्त्याने लेखी अभिस्वीकृती स्वाक्षरित केली किंवा भरणा केला एवढ्याच कारणावरून प्रभारपात्र होत नाही.

(३) उक्त कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) जो कोणत्याही संपत्तीचा मर्यादित मालक हिंदू कायद्याद्वारे नियंत्रित होतो त्याने किंवा त्याच्या रीतसर प्राधिकृत अभिकर्त्याने कोणत्याही दायित्वासंबंधी अभिस्वीकृती स्वाक्षरित केल्यास किंवा भरणा केल्यास, दायित्व मागाहून ज्याच्याकडे परत जाणार त्या व्यक्तीपुरती ती विधिग्राह्य अभिस्वीकृती किंवा, प्रकरणपरत्वे, तो विधिग्राह्य भरणा होईल; आणि

(ख) जेव्हा हिंदू अविभक्त कुटुंब म्हणून एखाद्या कुटुंबावर किंवा त्यांच्या वतीने एखाद्यावर दायित्व आले असेल तेव्हा, त्या कुटुंबाच्या तत्कालीन कर्त्याने किंवा त्याच्या रीतसर प्राधिकृत अभिकर्त्याने अभिस्वीकृती दिल्यास किंवा भरणा केल्यास संपूर्ण कुटुंबाच्या वतीने ती अभिस्वीकृती देण्यात आली किंवा तो भरणा करण्यात आला असे मानण्यात येईल.

२१. (१) दावा सुरू केल्यानंतर मूळच्या ऐवजी किंवा मूळच्या खेरीज आणखी नवीन वादी किंवा प्रतिवादी आणला गेल्यास, त्याला याप्रमाणे पक्षकार करण्यात येईल तेव्हा तो दावा सुरू झाला असे त्याच्यापुरते मानण्यात येईल : मूळच्या ऐवजी किंवा मूळच्या खेरीज आणखी नवीन वादी किंवा प्रतिवादी आणल्याचा परिणाम.

परंतु, प्रामाणिकपणे झालेल्या चूकभुलीमुळे नवीन वादी किंवा प्रतिवादी आणण्याचे राहून गेले याबाबत न्यायालयाची खात्री झाली तर, तो दावा, आधीच्या एखाद्या दिनांकास सुरू झाला असे त्या वादीपुरते किंवा प्रतिवादीपुरते मानावे असे ते निदेशित करू शकेल.

(२) दावा प्रलंबित असतानाच्या काळात एखादा हितसंबंध अभिहस्तांकित किंवा प्रक्रांत झाल्यामुळे मूळच्यापेक्षा आणखी किंवा मूळच्याऐवजी नवीन पक्षकार आणला गेला असेल त्या प्रकरणात अथवा जेथे वादीला प्रतिवादी करण्यात आले असेल किंवा प्रतिवादीला वादी करण्यात आले असेल त्या प्रकरणात पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

२२. सतत चालू राहणाऱ्या संविदाभंगांच्या बाबतीत किंवा सतत चालू राहणाऱ्या अपकृतीच्या बाबतीत ज्या ज्या क्षणाला भंग किंवा, प्रकरणपरत्वे, अपकृती चालू राहाते त्या प्रत्येक क्षणापासून नव्याने मुदतमर्यादा सुरू होते. सतत चालू राहणारे भंग व अपकृती.

२३. जी कृती तिच्यातून काही विशिष्ट क्षती प्रत्यक्षात निष्पन्न झाल्याशिवाय वादकारण निर्माण करत नाही अशा कृतीबद्दल भरपाईसाठी लावावयाच्या दाव्याच्या बाबतीत, क्षती जेव्हा निष्पन्न होते त्या वेळेपासून मुदतमर्यादा मोजण्यात येईल. विशेष नुकसान झाल्याशिवाय कारवाईयोग्य न होणाऱ्या कृतीबद्दल भरपाईचे दावे.

२४. या अधिनियमाच्या प्रयोजनापुरते, सर्व संलेख ग्रेगेरियन कालगणनेला धरून केले असल्याचे मानण्यात येईल. संलेखांमध्ये उल्लेखिलेल्या कालाची गणना.

## भाग चार

## कब्जाद्वारे मालकी संपादन करणे

२५. (१) जर एखाद्या इमारतीत प्रवेश करण्याची आणि तीसाठी प्रकाश किंवा हवा मिळण्याची वहिवाट त्या इमारतीच्या संबंधात सुविधाधिकार म्हणून आणि हक्क म्हणून व अखंडपणे वीस वर्षांपर्यंत निर्वेधपणे उपभोगली गेली असेल तर, आणि जर एखाद्या मार्गाची किंवा जलमार्गाची किंवा एखाद्या पाण्याचा वापर करण्याची वहिवाट किंवा अन्य कोणताही सुविधाधिकार (मग तो अस्तिवाची असो वा नास्तिवाची असो) त्यावर हक्क सांगणाऱ्या व्यक्तीने सुविधाधिकार म्हणून आणि हक्क म्हणून व अखंडपणे वीस वर्षांपर्यंत निर्वेधपणे आणि उघडपणे उपभोगला असेल तर, असा प्रवेश करण्याचा आणि प्रकाश किंवा हवा मिळण्याचा, मार्गाचा, जलमार्गाचा, पाण्याचा वापराचा किंवा अन्य सुविधाधिकार निरपवाद आणि गोपनीय असेल. चिरभोगाद्वारे सुविधाधिकार संपादन करणे.

(२) वीस वीस वर्षांच्या उक्त अवधींपैकी प्रत्येक अवधी हा ज्या हक्कमागणीशी तो संबंधित आहे तिला ज्या दाव्यात हरकत घेतलेली असेल तो दावा दाखल करण्याच्या लगतपूर्व दोन वर्षांच्या आत संपणारा असल्याचे समजण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) खाली ज्या संपत्तीवर हक्क सांगण्यात येईल ती शासनाच्या मालकीची असेल तर त्या पोट-कलमात जणू काही 'वीस वर्षे' याऐवजी 'तीस वर्षे' हा शब्दोल्लेख घातलेला असावा त्याप्रमाणे ते वाचले जाईल.

**स्पष्टीकरण.**—जेथे मागणीदाराहून अन्य व्यक्तीच्या कृत्यामुळे अटकाव झाल्याकारणाने कब्जा किंवा उपभोग प्रत्यक्षात थांबला असून अशा अटकावाची व तो करणाऱ्या किंवा तो करण्यास प्राधिकार देणाऱ्या व्यक्तीची मागणीदाराला दखल मिळाल्यानंतर एक वर्षापर्यंत ते निमूटपणे सहन केले गेले आहे किंवा त्यास मूकसंमती देण्यात आली आहे असे झाल्याशिवाय, कोणतीही गोष्ट या कलमाच्या अर्थाअन्वये "खंड" ठरणार नाही.

अनुसेवी स्थावर ज्यांच्याकडे परत जाणार त्याला अनुकूल अशा प्रकारे वगळणूक.

२६. जर एखादी जमीन अगर पाणी यावर किंवा त्यावरून किंवा त्यापासून कोणताही सुविधाधिकार उपभोगला गेला असून किंवा तो प्राप्त झाला असून आजीव हितसंबंधाच्या अन्वये किंवा आधारे अथवा तो सुविधाधिकार देण्यात आल्यापासून तीनपेक्षा अधिक वर्षांच्या मुदतीने तेथे वहिवाट करण्यात आली असेल तर, असा हितसंबंध किंवा मुदत संपुष्टात आल्यावर, उक्त जमिनीस व पाण्यास हक्कदार होणाऱ्या व्यक्तीने, अशा समाप्तीच्या लगतनंतरच्या तीन वर्षांच्या आत त्या मागणीला विरोध केला तर, वीस वर्षांचा कालावधी मोजताना, असा हितसंबंध किंवा मुदत चालू असताना असा सुविधाधिकार जितका काळ उपभोगला गेला तो काळ वगळला जाईल.

संपत्तीवरील अधिकार नष्ट होणे.

२७. कोणत्याही संपत्तीच्या कब्जासाठी दावा दाखल करण्याबाबत एखाद्या व्यक्तीला याद्वारे नेमून दिलेली कालमर्यादा संपताच अशा संपत्तीवरील तिचा अधिकार नष्ट होईल.

## भाग पाच

## संकीर्ण

२८. (निरसन) निरसन व विशोधन अधिनियम, १९७४ (१९७४ चा ५६) कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे निरसित.

व्यावृत्ती.

२९. (१) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे भारतीय संविदा अधिनियम, १८७२ (१८७२ चा ९) याच्या कलम २५ वर परिणाम होणार नाही.

(२) जर कोणत्याही दाव्यासाठी, अपिलासाठी किंवा अर्जासाठी अनुसूचीद्वारे विहित करण्यात आलेल्याहून वेगळी अशी मुदतमर्यादा कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याद्वारे विहित करण्यात आली असेल तर, अशी मुदत म्हणजे जणू काही अनुसूचीद्वारे विहित केलेला कालावधी असावा त्याप्रमाणे कलम ३ चे उपबंध लागू होतील, आणि कोणताही दावा, अपील किंवा अर्ज यांकरिता कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याने विहित केलेली मुदतमर्यादा निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, ४ ते २४ (दोन्ही धरून) या कलमांमध्ये अंतर्भूत असलेले उपबंध ज्या बाबतीत आणि जितक्या मर्यादेपर्यंत अशा विशेष किंवा स्थानिक कायद्याद्वारे वगळण्यात आलेले नाहीत त्याच बाबतीत व तितक्याच मर्यादेपर्यंत लागू होतील.

(३) विवाह व घटस्फोट यासंबंधी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अन्यथा उपबंधित केले असल्यास तेवढे खेरीजकरून एरव्ही, अशा कोणत्याही कायद्याखालील कोणत्याही दाव्यात किंवा अन्य कार्यवाहीत या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(४) भारतीय सुविधाधिकार अधिनियम, १८८२ (१८८२ चा ५) हा ज्या राज्यक्षेत्रावर त्या त्या काळी विस्तारित केला जाईल त्या राज्यक्षेत्रांत उद्भवणाऱ्या प्रकरणांना २५ व २६ ही कलमे आणि कलम २ मधील "सुविधाधिकार" याची व्याख्या लागू होणार नाही.

ज्यांकरता विहित केलेला कालावधी हा भारतीय मुदत अधिनियम, १९०८ द्वारा विहित केलेल्या कालावधीहून कमी असेल असे दावे, इ. करता उपबंध.

३०. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) एखाद्या दाव्याकरता विहित केलेली मुदतमर्यादा भारतीय मुदत अधिनियम, १९०८ (१९०८ चा ९) याद्वारे विहित केलेल्या मुदतमर्यादेहून कमी असेल तर, या अधिनियमाच्या, प्रारंभाच्या लगतनंतरच्या [१][सात वर्षांचा] कालावधी अथवा अशा दाव्याकरता भारतीय मुदत अधिनियम १९०८ (१९०८ चा ९) याद्वारे विहित केलेला कालावधी यांपैकी जो आधी संपत असेल त्या कालावधीच्या आत असा कोणताही दावा लावता येईल;

कलम ३०(क) चे परंतुक

[२][परंतु, अशा कोणत्याही दाव्याच्या बाबतीत, सात वर्षांचा उक्त कालावधी, भारतीय मुदत अधिनियम, १९०८ याअन्वये त्यासाठी विहित केलेल्या मुदतमर्यादेच्या अगोदर संपत असेल आणि भारतीय मुदत अधिनियम, १९०८ याखालील अशा दाव्याच्या बाबतीतील जेवढा मुदतमर्यादेचा कालावधी या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच संपला असेल तेवढ्या कालावधीसह सात वर्षांचा कालावधी या अधिनियमाअन्वये अशा दाव्यासाठी विहित केलेल्या कालावधीहून कमी भरत असेल तर, या अधिनियमाअन्वये दाव्यासाठी विहित केलेल्या मुदतमर्यादेत तो दावा सुरू करता येईल.]

(ख) एखाद्या अपिलाकरता किंवा अर्जाकरता विहित केलेली मुदतमर्यादा भारतीय मुदत अधिनियम, १९०८ (१९०८ चा ९) याद्वारे विहित केलेल्या मुदतमर्यादेहून कमी असेल तर, या नियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतरच्या नव्वद दिवसांचा कालावधी अथवा अशा अपिलाकरता किंवा अर्जाकरता भारतीय मुदत अधिनियम, १९०८ (१९०८ चा ९) याद्वारे विहित केलेला कालावधी यांपैकी जो आधी संपत असेल त्या कालावधीच्या आत असे अपील किंवा अर्ज करता येईल.

---

[१] १९६९ चा अधिनियम क्रमांक १०, कलम २ द्वारे "पाच वर्षांचा" या मजकुराऐवजी भूतलक्षी प्रभावासह समाविष्ट केले.

[२] १९६९ चा अधिनियम क्रमांक १०, कलम २ द्वारे हे परंतुक समाविष्ट केले.

मुदतबाह्य किंवा प्रलंबित दावे, इ.च्या संबंधात उपबंध.

३१. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे,—

(क) ज्याकरता भारतीय मुदत अधिनियम, १९०८ (१९०८ चा ९) यांद्वारे विहित केलेली मुदतमर्यादा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी संपलेली आहे असा कोणताही दावा लावणे किंवा अपील अगर अर्ज करणे शक्य होणार नाही, अथवा

(ख) असा प्रारंभ होण्यापूर्वी लावलेल्या किंवा केलेल्या अथवा असा प्रारंभ होण्याच्या वेळी प्रलंबित असलेल्या कोणत्याही दाव्यावर, अपिलावर किंवा अर्जावर परिणाम होणार नाही.

३२. [निरसन] निरसन व विशोधन अधिनियम, १९७४ (१९७४ चा ५६) कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे निरसित.

## अनुसूची

### मुदतमर्यादा

[कलमे २ (ज्) आणि ३ पहा]

### पहिला विभाग—दावे

| अनुक्रमांक | दाव्याचे वर्णन | मुदत मर्यादा | मुदत जेव्हापासून सुरू होते ती वेळ |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | **भाग एक—हिशेबांसंबंधीचे दावे** | | |
| १ | पक्षापक्षांमध्ये परस्परांची देणीघेणी असतील तर, परस्पर, खुल्या व चालू खात्यावर देय असलेल्या बाकीकरता. | तीन वर्षे .. | मान्य किंवा शाबीत झालेली अखेरची बाब ज्या वर्षी हिशेबात नोंदली गेली असेल त्याच्या अखेरीपासून; अशा वर्षाची गणना हिशेबात दिल्याप्रमाणे करावयाची. |
| २ | वखारियाविरुद्ध हिशेबाकरिता .. | तीन वर्षे .. | अभिकरण चालू असताना, हिशेबाची मागणी करण्यात येऊन ती नाकारण्यात आली असेल तेव्हापासून किंवा अशी कोणतीही मागणी करण्यात आली नसल्यास अभिकरण संपुष्टात येते तेव्हापासून. |
| ३ | आपल्या अभिकर्त्याला जंगम मालमत्ता मिळाली असून त्याने तिचा हिशेब दिलेला नसेल तेव्हा, प्रकर्त्याने त्याच्या विरुद्ध लावावयाचा. | तीन वर्षे .. | अभिकरण चालू असताना हिशेबाची मागणी करण्यात येऊन ती नाकारण्यात आली असेल तेव्हापासून, किंवा अशी कोणतीही मागणी केलेली नसल्यास अभिकरण संपुष्टात येते तेव्हापासून. |
| ४ | उपेक्षा किंवा गैरवर्तन झाल्याबद्दल प्रकर्त्याने अभिकर्त्याविरुद्ध लावावयाचे अन्य दावे. | तीन वर्षे .. | उपेक्षा किंवा गैरवर्तन वादीच्या निदर्शनाला येते तेव्हापासून. |
| ५ | विसर्जित भागीदारीचा हिशेब व तिच्या नफ्यातील हिस्सा यांकरता. | तीन वर्षे .. | विसर्जनाच्या दिनांकापासून. |
| | **भाग दोन—संविदांसंबंधीचे दावे** | | |
| ६ | खलाशाच्या वेतनाकरता .. | तीन वर्षे | ज्या जलप्रवासात वेतन अर्जित झाले असेल त्याच्या अखेरीपासून. |
| ७ | अन्य कोणत्याही व्यक्तींच्या बाबतीत वेतना करता. | तीन वर्षे .. | वेतन देय म्हणून प्रोद्भूत होते तेव्हापासून. |

एच ४३६८—५ (१,१००—११-९३)

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ८ | हॉटेल, पांथशाला किंवा निवासगृह यांच्या चालकाने विकलेल्या अन्नपदार्थांच्या किंवा पेयाच्या किमतीकरता. | तीन वर्षे | .. अन्नपदार्थ किंवा पेय देण्यात येते तेव्हापासून. |
| ९ | राहण्याच्या सोयीबद्दलच्या भाड्याकरता .. | तीन वर्षे | .. भाडे प्रदेय होते तेव्हापासून. |
| १० | माल गहाळ केल्याबद्दल किंवा त्याची खराबी केल्याबद्दल परिवाहकाविरुद्धभरपाईकरता. | तीन वर्षे | .. तो गहाळ किंवा खराब होतो तेव्हापासून. |
| ११ | मालाची सुपूर्दगी न केल्याबद्दल किंवा सुपूर्दगी करण्यास विलंब केल्याबद्दल परिवाहकाविरुद्ध भरपाईकरिता. | तीन वर्षे | .. मालाची सुपूर्दगी व्हावयास हवी होती तेव्हापासून. |
| १२ | जनावरे, वाहने, बोटी किंवा गृहोपयोगी फर्निचर यांच्या भाड्याकरता. | तीन वर्षे | भाडे प्रदेय होते तेव्हापासून. |
| १३ | सुपूर्द करण्यात यावयाच्या मालाबद्दल आगाऊ दिलल्या पैशातील बाकीकरता. .. | तीन वर्षे | .. माल सुपूर्द करावयास हवा होता तेव्हापासून. |
| १४ | विकलेल्या आणि सुपूर्द केलेल्या मालाच्या किंमतीकरता उधारीची निश्चित मुदत ठरलेली नसेल त्याबाबतीत. | तीन वर्षे | .. मालाच्या सुपूर्दगीच्या दिनांकापासून. |
| १५ | विकलेल्या आणि सुपूर्द केलेल्या मालाच्या किमतीकरता उधारीची निश्चित मुदत संपल्यानंतर किंमत चुकती करावयाची होती अशा बाबतीत. | तीन वर्षे | .. उधारीची मुदत संपते तेव्हापासून. |
| १६ | विनिमयपत्राद्वारे ज्याची किंमत चुकती करावयाची होती अशा विकलेल्या व सुपुर्द केलेल्या मालाच्या किमतीकरता-असे कोणतेही विनियमपत्र देण्यात आलेले नसताना. | तीन वर्षे | .. नियोजित विनियमपत्राची मुदत संपते तेव्हापासून. |
| १७ | वादीने प्रतिवादीला विकलेल्या झाडांच्या किंवा वाढत्या पिकांच्या किमतीकरता—उधारीची निश्चित मुदत ठरलेली नसेल त्याबाबतीत. | तीन वर्षे | .. विक्रीच्या दिनांकापासून. |
| १८ | वादीने प्रतिवादीसाठी त्याच्या विनंतीवरून केलेल्या कामाबद्दलच्या पैशांकरता—पैसे देण्याची वेळ ठरलेली नसेल त्याबाबतीत. | तीन वर्षे | .. काम केले जाते तेव्हापासून. |
| १९ | कर्जाऊ देण्यात आलेल्या पैशाबद्दल येणे असलेल्या पैशाकरिता. | तीन वर्षे | .. कर्ज देण्यात येते तेव्हापासून. |
| २० | कर्जदात्याने पैशासाठी धनादेश दिला असेल त्याबाबतीत लावावयाचा तशाच प्रकारचा दावा. | तीन वर्षे | .. धनादेशाचे पैसे देण्यात येतात तेव्हापासून |
| २१ | मागणी होताच पैसे फेडावे लागतील अशा कराराने कर्जाऊ देण्यात आलेल्या पैशाकरता. | तीन वर्षे | .. कर्ज देण्यात येते तेव्हापासून. |
| २२ | मागणी होताच पैसे द्यावे लागतील अशा करारानें ठेव म्हणून दिलेल्या पैशांकरता—ग्राहकाचे आपल्या बँकरच्या हातात असलेले जे पैसे तशा प्रकारे प्रदेय असतील त्यांचाही यात समावेश आहे. | तीन वर्षे | .. मागणी करण्यात येते तेव्हापासून. |
| २३ | प्रतिवादीकरता वादीने पैसे दिल्याबद्दल वादीला येणे असलेल्या पैशांकरता. | तीन वर्षे | .. पैसे देण्यात येतात तेव्हापासून. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २४ | वादीच्या उपयोगाकरिता प्रतिवादीला पैसे मिळाल्याबद्दल प्रतिवादीकडून वादीला येणे असलेल्या पैशांकरिता. | तीन पैसे | .. पैसे मिळतात तेव्हापासून. |
| २५ | प्रतिवादीकडून वादीला येणे असलेल्या पैशावरील व्याज म्हणून येणे असलेल्या पैशांकरिता. | तीन वर्षे | .. व्याज देय होते तेव्हापासून. |
| २६ | प्रतिवादीकडून वादीला त्यांच्यामध्ये मान्य झालेल्या हिशेबाप्रमाणे पैसे येणे असल्याचे आढळल्यानुसार वादीला येणे असलेल्या पैशांकरिता. | तीन वर्षे | .. प्रतिवादीने किंवा त्यांबाबत रीतसर प्राधिकृत झालेल्या त्याच्या अभिकर्त्याने स्वाक्षरित केलेल्या लेखान्वये हिशेब मान्य करण्यात येतात तेव्हापासून— मात्र ऋण घेण्याच्याच वेळी पूर्वी म्हटल्याप्रमाणे स्वाक्षरित केलेल्या लेखी करारानें ते एखाद्या भविष्यकालीन वेळी प्रदेय केलेले असेल तर, ती वेळ, येईल तेव्हापासून. |
| २७ | विनिर्दिष्ट वेळी किंवा विनिर्दिष्ट संभावी घटना घडल्यास एखादी कृती करण्याच्या वचनाचा भंग केल्याबद्दल भरपाईकरता. | तीन वर्षे | .. विनिर्दिष्ट वेळ येते तेव्हापासून किंवा तशी संभावी घटना घडते तेव्हापासून. |
| २८ | एकेरी बंधपत्रावरून—भरणा करण्याकरता दिवस विनिर्दिष्ट केलेला असेल त्याबाबतीत. | तीन वर्षे | .. अशा विनिर्दिष्ट दिवसापासून. |
| २९ | एकेरी बंधपत्रावरून—असा कोणताही दिवस विनिर्दिष्ट केलेला नसेल त्याबाबतीत. | तीन वर्षे | .. बंधपत्र निष्पादित केल्याच्या दिनांकापासून. |
| ३० | सशर्त बंधपत्रावरून .. .. | तीन वर्षे | .. शर्त मोडली जाते तेव्हापासून. |
| ३१ | दिनांकोत्तर नियत वेळेला प्रदेय असलेल्या विनिमयपत्रावरून किंवा वचनचिठ्ठीवरून. | तीन वर्षे | .. विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी देय होते तेव्हापासून. |
| ३२ | दर्शनी किंवा दर्शनोत्तर—पण नियत वेळेला नव्हे—प्रदेय असलेल्या विनिमयपत्रावरून. | तीन वर्षे | .. विनिमयपत्र उपस्थित करण्यात येते तेव्हापासून. |
| ३३ | विशिष्ट ठिकाणी प्रदेय म्हणून स्वीकारलेल्या विनिमयपत्रावरून. | तीन वर्षे | .. त्या ठिकाणी विनिमयपत्र उपस्थित केले जाते तेव्हापासून. |
| ३४ | दर्शनोत्तर किंवा मागणी झाल्यानंतर नियत वेळी प्रदेय असलेल्या विनिमयपत्रावरून किंवा वचनचिट्ठीवरून. | तीन वर्षे | .. नियत वेळ संपते तेव्हापासून. |
| ३५ | मागणी होताच पैसे द्यावे लागणार असून ज्यासोबत, दावा लावण्यांच्या अधिकारावर निर्बंध घालणारा किंवा तो पुढे ढकलणारा कोणताही लेख नाही अशा विनिमयपत्रावरून किंवा वचनचिट्ठीवरून. | तीन वर्षे | .. विनिमयपत्राच्या किंवा वचनचिट्ठीच्या दिनांकापासून. |
| ३६ | हप्त्याहप्त्यांनी प्रदेय असलेल्या वचनचिट्ठीवरून किंवा बंधनपत्रावरून. | तीन वर्षे | .. पहिला हप्ता भरण्याचा अवधी संपण्याच्या वेळी प्रदेय असलेल्या भागाबाबत तो अवधी संपेल तेव्हापासून; आणि अन्य भागांच्या बाबतीत, भरण्याचा तो तो अवधी संपेल तेव्हापासून. |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३७ | हप्त्याहप्त्यांनी प्रदेय असलेल्या ज्या वचनचिठ्ठीत किंवा बंधपत्रात, एक किंवा अधिक हप्ते भरण्यात कसूर झाल्यास संपूर्ण रक्कम देय होईल अशी तरतूद असेल त्यावरून. | तीन वर्षे | कसूर करण्यात येते तेव्हापासून—मात्र प्रदेयीने किंवा आबद्ध व्यक्तीने त्या तरतुदीच्या लाभाबाबत हक्कवर्जन केल्यास त्याबाबतीत, पुन्हा कसूर करण्यात येऊन त्याबाबत असे हक्कवर्जन करण्यात आले नसेल तर, ती कसूर झाल्यापासून. |
| ३८ | वचनचिठ्ठी लिहिणाऱ्याने ती त्रयस्थ व्यक्तीकडे दिलेली असून विवक्षित घटना घडल्यास त्यानंतर ती प्रदेयीला सुपूर्द करावयाची असेल तेव्हा, तीवरून. | तीन वर्षे | प्रदेयीला सुपूर्दगी केल्याच्या दिनांकापासून. |
| ३९ | अवमानलेल्या ज्या विदेशी विपत्रावर प्रतिसाक्षन झालेले असून नोटीस दिलेली असेल त्यावरून. | तीन वर्षे | नोटीस देण्यात येते तेव्हापासून. |
| ४० | अस्वीकारामुळे जे अवमानले गेले असेल त्या विनिमयपत्राच्या विकर्षकाविरुद्ध प्रदेयीने लावावयाचा. | तीन वर्षे | स्वीकारण्यास नकार दिल्याच्या दिनांकापासून. |
| ४१ | सोय-विपत्राच्या स्वीकर्त्याने विकर्षकाविरुद्ध लावावयाचा. | तीन वर्षे | स्वीकर्ता विनिमयपत्राची रक्कम देतो तेव्हापासून. |
| ४२ | जामीनदाराने मुख्य ऋणकोविरुद्ध लावावयाचा. | तीन वर्षे | जामीनदार धनकोची फेड करतो तेव्हापासून. |
| ४३ | जामीनदाराने सह-जामीनदाराविरुद्ध लावावयाचा. | तीन वर्षे | जामीनदार आपल्या वाट्याच्या रकमेपेक्षा काही अधिक भरणा करतो तेव्हापासून. |
| ४४ | (क) विमाकाराला मृत्यूचा पुरावा देण्यात आल्यानंतर किंवा मिळाल्यानंतर विम्याची रक्कम द्यावयाची असेल त्याबाबतीत, त्या विमापत्रावरून. | तीन वर्षे | मृताच्या मृत्यूच्या दिनांकापासून, किंवा विमापत्रावरून केलेली मागणी संपूर्णतः किंवा अंशतः नाकारण्यात आली असेल तर अशा नकाराच्या दिनांकापासून. |
| | (ख) विमाकाराला हानीचा पुरावा देण्यात आल्यानंतर किंवा मिळाल्यानंतर विम्याची रक्कम द्यावयाची असेल त्याबाबतीत, त्या विमापत्रावरून. | तीन वर्षे | हानीस कारणीभूत होणाऱ्या घटनेच्या दिनांकापासून, किंवा विमापत्रावरून केलेली मागणी संपूर्णतः किंवा अंशतः नाकारण्यात आली असेल तर, अशा नकाराच्या दिनांकापासून. |
| ४५ | विमाकाराच्या मर्जीनुसार शून्यकरणीय असलेल्या विमापत्रान्वये दिलेले हप्ते वसूल करण्यासाठी विमेदाराने लावावयाचा. | तीन वर्षे | विमाकार विमापत्र शून्य करण्याचे ठरवतो तेव्हापासून. |
| ४६ | मृत्यूपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने जिला उत्तरदान दिले असेल किंवा वितरित केले असेल अशा व्यक्तीला ते परत करण्यास भाग पाडण्यासाठी, भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (१९२५ चा ३९), कलम ३६० किंवा कलम ३६१ खाली लावावयाचा. | तीन वर्षे | उत्तरदान दिल्याच्या किंवा वितरित केल्याच्या दिनांकापासून. |
| ४७ | अस्तित्वात असलेल्या प्रतिफलादाखल पैसे देण्यात आले असून ते प्रतिफल मागाहून निष्फळ झाले असता त्या पैशांकरता. | तीन वर्षे | निष्फळ झाल्याच्या दिनांकापासून. |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ४८ | संयुक्त हुकूमनाम्याखाली देय असलेली संपूर्ण रक्कम किंवा तीपैकी आपल्या वाटयाच्या रकमेहून जास्त रक्कम ज्याने भरली असेल त्या पक्षाने अथवा संयुक्त संपदेतील ज्या हिस्सेदाराने तो स्वतः व त्याचे सह-हिस्सेदार यांच्याकडून देय असलेली संपूर्ण महसूल रक्कम किंवा तीपैकी आपल्या वाटयाच्या रकमेपेक्षा जास्त रक्कम भरली असेल त्याने अंशदानासाठी लावावयाचा. | तीन वर्षे .. | वादीच्या स्वतःच्या वाटयापेक्षा जास्त रक्कम भरल्याच्या दिनांकापासून. |
| ४९ | मृत न्यासीच्या संपदेविरुद्ध अंशदानाची मागणी पुरी करवून घेण्यासाठी सहन्यासीने लावावयाचा. | तीन वर्षे .. | अंशदानावरील अधिकार प्रोद्भूत होतो तेव्हापासून. |
| ५० | अविभक्त कुटुंबाच्या संयुक्त संपदेच्या कर्त्याने संपदेच्या कारणे स्वतः केलेल्या भरण्या-संबंधात अंशदानासाठी लावावयाचा. | तीन वर्षे .. | भरणा केल्याच्या दिनांकापासून. |
| ५१ | वादीच्या स्थावर मालमत्तेपासून मिळणारा फायदा प्रतिवादीने गैरपणे घेतला असल्यास, त्या फायद्याकरता. | तीन वर्षे .. | फायदा घेतला जातो तेव्हापासून. |
| ५२ | भाडयाच्या थकबाकीसाठी .. | तीन वर्षे .. | थकबाकी देय होते तेव्हापासून. |
| ५३ | स्थावर संपत्तीची खरेदीची किंमत चुकती झालेली नसेल तर खरेदीदाराकडून जातीने तिचा भरणा व्हावा यासाठी विक्रेत्याने लावावयाचा. | तीन वर्षे .. | विक्री पूर्ण करण्यासाठी नियत केलेल्या वेळेपासून किंवा (विक्री पूर्ण करण्या-साठी नियत केलेल्या वेळेनंतर हक्क स्वीकारला गेला असेल तर) स्वीका-राच्या दिनांकापासून. |
| ५४ | संविदेच्या विनिर्दिष्ट पालनाकरता .. | तीन वर्षे .. | पालनाकरता नियत केलेल्या दिनांका-पासून, किंवा असा कोणताही दिनांक नियत केला नसेल तर, पालन करण्यास नकार देण्यात आला आहे याची वादीला दखल मिळते तेव्हापासून. |
| ५५ | यात खास ज्याबद्दल उपबंध केलेला नाही अशा व्यक्त किंवा उपलक्षित संविदेच्या भंगाबद्दल भरपाईकरता. | तीन वर्षे .. | संविदेचा भंग करण्यात येतो तेव्हापासून, किंवा (लागोपाठ अनेकदा भंग होतो त्या बाबतीत) ज्यासंबंधी दावा केलेला असेल असा भंग घडून येतो तेव्हापासून, किंवा (भंग सतत चालू राहाणारा असेल तर) तो थांबतो तेव्हापासून. |
| | **भाग तीन—घोषणांसंबंधीचे दावे** | | |
| ५६ | दिलेला किंवा नोंदणी केलेला संलेख बनावट असल्याचे घोषित करण्याकरिता. | तीन वर्षे .. | देणे किंवा नोंदणी वादीला माहीत होते तेव्हापासून. |
| ५७ | अभिकथित दत्तविधान विधिबाह्य आहे किंवा प्रत्यक्षात ते कधी झालेच नाही अशी घोषणा मिळवण्यासाठी. | तीन वर्षे .. | अभिकथित दत्तविधान वादीला माहीत होते तेव्हापासून. |
| ५८ | अन्य कोणतीही घोषणा मिळवण्यासाठी .. | तीन वर्षे .. | दावा लावण्याचा अधिकार प्रथम प्राप्त होतो तेव्हापासून. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **भाग चार—हुकूमनामे व संलेख यांसंबंधीचे दावे** | | |
| ५९ | संलेख किंवा हुकूमनामा रद्द करण्यासाठी किंवा अपास्त करण्यासाठी अथवा संविदा विखंडित करण्यासाठी. | तीन वर्षे .. | वादीला संलेख किंवा हुकूमनामा रद्द किंवा अपास्त करवून घेण्याचा अथवा संविदा विखंडित करवून घेण्याचा हक्क मिळवून देणारी तथ्ये त्याला प्रथम माहीत होतात तेव्हापासून. |
| ६० | पाल्याच्या पालकाने केलेले संपत्तीचे हस्तांतरण रद्द ठरवण्यासाठी— | | |
| | (क) सज्ञान झालेल्या पाल्याने लावावयाचा; | तीन वर्षे .. | पाल्य सज्ञान होतो तेव्हापासून. |
| | (ख) (एक) सज्ञान झाल्यापासून तीन वर्षांच्या आत पाल्य मृत्यू पावल्यास; | तीन वर्षे .. | पाल्य सज्ञान होतो तेव्हापासून. |
| | (दोन) सज्ञान होण्यापूर्वी पाल्य मृत्यू पावल्यास; | तीन वर्षे .. | पाल्य मृत्यू पावतो तेव्हापासून. |
| | पाल्याच्या वैध प्रतिनिधीने लावावयाचा. | | |
| | **भाग पाच—स्थावर संपत्तीसंबंधीचे दावे** | | |
| ६१ | (क) गहाण ठेवलेली स्थावर संपत्ती विमोचित करण्यासाठी किंवा तिचा कब्जा परत मिळवण्यासाठी ; | तीस वर्षे .. | विमोचन करण्याचा किंवा कब्जा परत मिळण्याचा हक्क प्रोद्भूत होतो तेव्हापासून. |
| | (ख) गहाण ठेवलेल्या आणि नंतर गहाणदाराने मूल्यवान प्रतिफलार्थ हस्तांतरित केलेल्या संपत्तीचा कब्जा परत मिळवण्यासाठी ; | बारा वर्षे .. | हस्तांतरण वादीला माहीत होते तेव्हापासून. |
| | (ग) गहाणधारकाची फेड झाल्यानंतर गहाणधारकाला मिळालेल्या अधिक रकमा वसूल करण्यासाठी. | तीन वर्षे .. | गहाणकार गहाण-संपत्तीच्या ठिकाणी पुन्हा प्रवेश करतो तेव्हापासून. |
| ६२ | गहाणाद्वारे प्रतिभूत केलेल्या किंवा स्थावर संपत्तीवर अन्यथा प्रभारित केलेल्या पैशाची फेड करवून घेण्यासाठी. | बारा वर्षे .. | ज्याबद्दल दावा लावण्यात यावयाचा तो पैसा देय होतो तेव्हापासून. |
| ६३ | (क) पुरोबंधासाठी .. .. | तीस वर्षे .. | गहाणाद्वारे प्रतिभूत केलेला पैसा देय होतो तेव्हापासून. |
| | (ख) गहाण ठेवलेल्या स्थावर संपत्तीच्या कब्जासाठी. गहाणधारकाने लावावयाचा. | बारा वर्षे .. | गहाणधारक कब्जाला हक्कदार होतो तेव्हापासून. |
| ६४ | वादीकडे स्थावर संपत्तीचा असलेला कब्जा त्याच्याकडून काढून घेण्यात आला असता, हक्काच्या नव्हे तर, पूर्वीच्या कब्जाच्या आधारावर कब्जा मिळवण्यासाठी. | बारा वर्षे .. | कब्जा काढून घेतल्याच्या दिनांकापासून. |
| ६५ | स्वत्वाधिकाराच्या आधारावर स्थावर संपत्तीचा किंवा त्यातील कोणत्याही हितसंबंधाचा कब्जा मिळवण्यासाठी. | बारा वर्षे .. | प्रतिवादीचा कब्जा वादीला विरुद्ध होतो तेव्हापासून. |
| | स्पष्टीकरण.—या अनुच्छेदाच्या प्रयोजनापुरते— | | |
| | (क) शेषभोगीने (भूस्वामीहून अन्य) प्रत्यावर्तभोगीने किंवा मृत्युपत्राधिकाऱ्याने दावा लावलेला असेल तर, जेव्हा | | |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | शेषभोगीला, प्रत्यावर्तभोगीला किंवा प्रकरणपरत्वे, मृत्युपत्राधिकाऱ्याला संपदेवर कब्जाधिकार प्राप्त होतो तेव्हाच फक्त प्रतिवादीचा कब्जा हा विरुद्ध कब्जा असल्याचे मानण्यात येईल ; | | |
| | (ख) हिंदू किंवा मुस्लिम स्त्रीच्या मृत्यूनंतर स्थावर संपत्तीच्या कब्जास हक्कदार असलेल्या हिंदूने किंवा मुस्लिमाने दावा लावावयाचा असेल तर, स्त्री मृत्यू पावते तेव्हाच प्रतिवादीचा कब्जा हा विरुद्ध कब्जा झाला असे मानण्यात येईल ; | | |
| | (ग) हुकूमनाम्याच्या बजावणीच्या विक्रीच्या वेळच्या खरेदीदाराने दावा लावला असून विक्रीच्या वेळी निर्णीत ऋणकोकडे कब्जा नसेल तर, खरेदीदार हा ज्याच्याकडे कब्जा नव्हता अशा निर्णीत ऋणकोचा प्रतिनिधी असल्याचे मानले जाईल. | | |
| ६६ | जेव्हा कोणत्याही समपहरणामुळे किंवा शर्तीचा भंग झाल्याकारणाने वादी स्थावर संपत्तीचा कब्जा मिळवण्यास हक्कदार झाला असेल त्याबाबतीत, तिच्या कब्जाकरता. | बारा वर्षे .. | समपहरण किंवा शर्तीचा भंग होतो तेव्हापासून. |
| ६७ | कुळाकडून कब्जा परत मिळवण्यासाठी मालकाने लावावयाचा. | बारा वर्षे .. | कुळवहिवाट समाप्त केली असेल तेव्हापासून. |

भाग सहा—जंगम संपत्तीसंबंधीचे दावे

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ६८ | हरवलेल्या अथवा चोरी करून किंवा अप्रामाणिक हेतूने अपहार करून किंवा विपरिवर्तन करून त्याद्वारे प्राप्त केलेल्या विनिर्दिष्ट जंगम संपत्तीकरता. | तीन वर्षे .. | संपत्तीच्या कब्जास हक्कदार असलेल्या व्यक्तीला ती संपत्ती कोणाच्या कब्जात आहे हे प्रथम माहीत होते तेव्हापासून. |
| ६९ | अन्य विनिर्दिष्ट जंगम संपत्तीकरता .. | तीन वर्षे .. | संपत्ती गैरपणे बळकावली जाते तेव्हापासून. |
| ७० | निक्षेपित केलेली किंवा तारण म्हणून ठेवलेली जंगम संपत्ती निक्षेपग्राहीकडून किंवा तारणधारकाकडून परत मिळवण्यासाठी. | तीन वर्षे .. | मागणी होऊन नकार देण्यात आल्याच्या दिनांकापासून. |
| ७१ | निक्षेपित केलेली किंवा तारण ठेवलेली जंगम संपत्ती नंतर निक्षेपग्राहीकडून किंवा तारणधारकाकडून मूल्यवान प्रतिफलार्थ विकत घेतली गेली अथवा ती परत मिळवण्यासाठी. | तीन वर्षे .. | वादीला विक्रीचे वृत्त माहीत होते तेव्हापासून. |

भाग सात—अपकृतीसंबंधीचे दावे

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ७२ | ज्या राज्यक्षेत्रावर या अधिनियमाचा विस्तार आहे तेथे त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याअन्वये म्हणून केलेल्या कृतीबद्दल किंवा अकृतीबद्दल भरपाईकरता. | एक वर्ष .. | कृती किंवा अकृती घडून येते तेव्हापासून. |
| ७३ | अवैध कारावासाबद्दल भरपाईकरता .. | एक वर्ष .. | कारावास संपतो तेव्हापासून. |

अनुसूची---चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ७४ | दुर्भावमूलक खटल्याबद्दल भरपाईकरता | एक वर्ष . . | वादीला दोषमुक्त करण्यात येते किंवा खटला अन्यथा संपुष्टात येतो तेव्हा-पासून. |
| ७५ | स्थायी बदनामीबद्दल भरपाईकरता . . | एक वर्ष . . | स्थायी बदनामी प्रकाशित होते तेव्हा-पासून. |
| ७६ | अस्थायी बदनामीबद्दल भरपाईकरता . . | एक वर्ष . . | शब्द उच्चारले जातात तेव्हापासून किंवा ते शब्द स्वभावतः कारवाईयोग्य नसल्यास, ज्याबद्दल तक्रार करण्यात आली ती विशेष हानी उद्‌भवते तेव्हापासून. |
| ७७ | वादीच्या चाकराला किंवा मुलीला फूस लावून नेल्यामुळे झालेल्या सेवा-हानीबद्दल भरपाईकरता. | एक वर्ष . . | हानी घडून येते तेव्हापासून. |
| ७८ | वादीबरोबर झालेल्या संविदेचा भंग करण्यास एखाद्या व्यक्तीला प्रवृत्त करण्याबद्दल भरपाईकरता. | एक वर्ष . . | संविदाभंगाच्या दिनांकापासून. |
| ७९ | अवैध, नियमबाह्य किंवा अतिरेकी तऱ्हेने अटकावणी लावल्याबद्दल भरपाईकरता. | एक वर्ष . . | अटकावणी लावल्याच्या दिनांकापासून. |
| ८० | वैध आदेशिकेच्या अधीन असलेल्या जंगम संपत्तीचे गैरपणे अभिग्रहण केल्याबद्दल भरपाईकरता. | एक वर्ष . . | अभिग्रहणाच्या दिनांकापासून. |
| ८१ | 'वैध प्रतिनिधींचे दावे अधिनियम, १८५५' (१८५५ चा १२) याखाली मृत्युपत्र व्यवस्थापक, प्रशासक किंवा प्रतिनिधी याने लावावयाचा. | एक वर्ष . . | आगळीक झालेल्या व्यक्तीच्या मृत्यूच्या दिनांकापासून. |
| ८२ | 'भारतीय, प्राणांतिक अपघात अधिनियम, १८५५' (१८५५ चा १३) याखाली मृत्युपत्र व्यवस्थापक, प्रशासक किंवा प्रतिनिधी याने लावावयाचा. | दोन वर्षे . . | ठार झालेल्या व्यक्तीच्या मृत्यूच्या दिनांकापासून. |
| ८३ | 'वैध प्रतिनिधींचे दावे अधिनियम, १८५५' (१८५५ चा १२) याखाली मृत्युपत्र व्यवस्थापक, प्रशासक किंवा अन्य कोणताही प्रतिनिधी याने लावावयाचा. | दोन वर्षे . . | ज्याबद्दल तक्रार करावयाची ती आगळीक करण्यात येते तेव्हापासून. |
| ८४ | विनिर्दिष्ट प्रयोजनांकरता एखादी संपत्ती वापरण्याचा अधिकार असताना, जी व्यक्ती अन्य प्रयोजनांकरता तिचा दुरुपयोग करते तिच्याविरुद्ध लावावयाचा. | दोन वर्षे . . | दुरुपयोगामुळे नुकसान झालेल्या व्यक्तीला तो दुरुपयोग प्रथम माहीत होतो तेव्हापासून. |
| ८५ | मार्गात किंवा जलप्रवाहात अडथळा निर्माण केल्याबद्दल भरपाईकरता. | तीन वर्षे . . | अडथळा निर्माण केल्याच्या दिनांकापासून. |
| ८६ | जलप्रवाह वळवल्याबद्दल भरपाईकरता . . | तीन वर्षे . . | वळवल्याच्या दिनांकापासून. |
| ८७ | जंगम मालमत्तेवर अतिक्रमण केल्याबद्दल भरपाईकरता. | तीन वर्षे . . | अतिक्रमणाच्या दिनांकापासून. |

**अनुसूची—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ८८ | कॉपीराइटचा किंवा अन्य कोणत्याही अन्य-वर्जी विशेष अधिकाराचा भंग केल्याबद्दल भरपाईकरता. | तीन वर्षे .. | भंग केल्याच्या दिनांकापासून. |
| ८९ | अपव्ययाला आळा घालण्याकरता .. | तीन वर्षे .. | अपव्ययाला सुरुवात होते तेव्हापासून. |
| ९० | गैरपणे मिळवलेल्या व्यादेशामुळे झालेल्या नुकसानाबद्दल भरपाईकरता. | तीन वर्षे .. | व्यादेश संपुष्टात येतो तेव्हापासून. |
| ९१ | (क) हरवलेली, अथवा चोरी करून किंवा अप्रामाणिक हेतूने अपहार करून किंवा विपरिवर्तन करून त्याद्वारे प्राप्त केलेली कोणतीही विनिर्दिष्ट जंगम संपत्ती गैरपणे बळकावल्याबद्दल किंवा अडकवून ठेवल्याबद्दल भरपाईकरता. | तीन वर्षे .. | जेव्हा संपत्तीच्या कब्जाचा अधिकार असलेल्या व्यक्तीला ती कोणाच्या कब्जात आहे हे प्रथम कळते तेव्हापासून. |
| | (ख) अन्य कोणतीही विनिर्दिष्ट जंगम संपत्ती गैरपणे बळकावल्याबद्दल किंवा तिचे नुकसान केल्याबद्दल अथवा ती गैरपणे अडकवून ठेवल्याबद्दल भरपाईकरता. | तीन वर्षे .. | संपत्ती गैरपणे बळकावली जाते किंवा तिचे नुकसान केले जाते तेव्हापासून. अथवा ती अडकावून ठेवणाराकडे असलेला कब्जा अवैध होतो तेव्हापासून. |
| | **भाग आठ—न्यास व न्याससंपत्ती यासंबंधीचे दावे** | | |
| ९२ | न्यास म्हणून अभिहस्तांकित केलेली किंवा मृत्युपत्राने दिलेली जी स्थावर संपत्ती नंतर विश्वस्थाकडून मूल्यवान प्रतिफलार्थ हस्तांतरित होते तिचा कब्जा परत मिळण्यासाठी. | बारा वर्ष .. | हस्तांतरणाचे वृत्त वादीला माहीत होते तेव्हापासून. |
| ९३ | न्यास म्हणून अभिहस्तांतरित केलेली किंवा मृत्यूपत्राने दिलेली जी जंगम मालमत्ता नंतर विश्वस्ताकडून मूल्यवान प्रतिफलार्थ हस्तांतरित होते तिचा कब्जा परत मिळवण्यासाठी. | तीन वर्षे .. | हस्तांतरणाचे वृत्त वादीला माहीत होते तेव्हापासून. |
| ९४ | हिंदू, मुस्लिम किंवा बौद्ध धार्मिक किंवा धर्मादाय दाननिधीत समाविष्ट असलेल्या स्थावर संपत्तीचे तिच्या व्यवस्थापकाने मूल्यवान प्रतिफलार्थ केलेले हस्तांतरण अपास्त करण्याकरता. | बारा वर्षे .. | हस्तांतरणाचे वृत्त वादीला माहीत होते तेव्हापासून. |
| ९५ | हिंदू, मुस्लिम किंवा बौद्ध धार्मिक किंवा धर्मादाय दाननिधीत समाविष्ट असलेल्या जंगम संपत्तीचे तिच्या व्यवस्थापकाने मूल्यवान प्रतिफलार्थ केलेले हस्तांतरण अपास्त करण्यासाठी. | तीन वर्षे .. | हस्तांतरणाचे वृत्त वादीला माहीत होते तेव्हापासून. |
| ९६ | हिंदू, मुस्लिम किंवा बौद्ध धार्मिक किंवा धर्मादाय दाननिधीत समाविष्ट असलेली जी जंगम किंवा स्थावर संपत्ती आधीच्या व्यवस्थापकाने मूल्यवान प्रतिफलार्थ हस्तांतरित केली असेल तिचा कब्जा परत मिळवण्याकरता विद्यमान व्यवस्थापकाने लावावयाचा. | बारा वर्षे .. | हस्तांतरकाच्या मृत्यूचा, राजीनाम्याचा किंवा त्याला दूर करण्यात आल्याचा दिनांक अथवा वादीला दाननिधीचा व्यवस्थापक म्हणून नियुक्त केल्याचा दिनांक यांपैकी नंतरच्या दिनांकापासून |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **भाग नऊ—संकीर्ण बाबींसंबंधीचे दावे** | | |
| ९७ | अग्रक्रय हक्क हा कायद्यावर किंवा सर्वसाधारण परिपाठावर आधारित असो वा विशिष्ट संविदेवर आधारित असो—तो हक्क बजावण्याकरता. | एक वर्ष .. | ज्या विक्रीला हरकत घेण्याचा प्रयत्न असेल अशा विक्रीतील खरेदीदार जेव्हा विक्री झालेल्या संपूर्ण संपत्तीचा किंवा तिच्या भागाचा प्रत्यक्ष कब्जा घेतो तेव्हापासून, किंवा विक्रीच्या संपूर्ण विषयवस्तूचा किंवा तिच्या भागाचा प्रत्यक्ष कब्जा घेणे हे त्याच्या स्वरूपानुसार शक्य नसेल तर, विक्रीच्या संलेखाची नोंदणी केली जाते तेव्हापासून. |
| ९८ | जिच्याविरुद्ध 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) आदेश एकवीस, नियम ६३ किंवा १०३ खालील आदेश अथवा 'इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२' (१८८२ चा १५) याखाली आदेश देण्यात आला आहे ती व्यक्ती आदेशांत समाविष्ट असलेल्या संपत्तीवर जो अधिकार सांगत असेल तो प्रस्थापित करण्याकरता तिने लावावयाचा. | एक वर्ष .. | अंतिम आदेशाच्या दिनांकापासून. |
| ९९ | दिवाणी किंवा महसूल न्यायालयाने केलेली विक्री अथवा शासनाला येणे असलेल्या महसुलाच्या थकबाकीकरता किंवा अशी थकबाकी म्हणून वसूल करण्याजोग्या अन्य कोणत्याही येणे रकमेकरता करण्यात आलेली विक्री अपास्त करण्यासाठी. | एक वर्ष .. | विक्री कायम केली जाते तेव्हापासून किंवा जर असा दावा लावला नसता तर एरव्ही ती जेव्हा अंतिम व निर्णायक झाली असती तेव्हापासून. |
| १०० | दाव्याहून अन्य अशा कोणत्याही कार्यवाहीतील दिवाणी न्यायालयाचा आदेश अथवा शासनाच्या अधिकाऱ्याने आपल्या पदाच्या नात्याने केलेल्या कोणत्याही कृतीत किंवा आदेशात फेरबदल करण्यासाठी किंवा कृती किंवा आदेश अपास्त करण्यासाठी. | एक वर्ष .. | न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून अथवा, प्रकरणपरत्वे, त्या अधिकाऱ्याच्या कृतीच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |
| १०१ | विदेशी न्यायनिर्णयासह कोणत्याही न्यायनिर्णयावरून किंवा मुचलक्यावरून. | तीन वर्षे .. | न्यायनिर्णयाच्या किंवा मुचलक्याच्या दिनांकापासून. |
| १०२ | वादीने तो भ्रमिष्ठ असताना अभिहस्तांतरित केलेल्या संपत्तीकरता. | तीन वर्षे .. | वादीला पूर्ववत सुबुद्धता प्राप्त होऊन त्याला अभिहस्तांतरणाची जाणीव होते तेव्हापासून. |
| १०३ | न्यासभंगामुळे उद्भवलेली हानी मृत विश्वस्ताच्या एकंदर संपदेतून भरून काढण्याकरता. | तीन वर्षे .. | विश्वस्ताच्या मृत्यूच्या दिनांकापासून किंवा त्यावेळेपर्यंत हानी उद्भवलेली नसल्यास हानीच्या दिनांकापासून |
| १०४ | नियतकालाने आवर्तित होणारा अधिकार प्रस्थापित करण्याकरता. | तीन वर्षे .. | अधिकाराचा उपभोग वादीला प्रथम नाकारण्यात येतो तेव्हापासून. |
| १०५ | हिंदूने निर्वाह-खर्चाच्या थकबाकीकरता लावावयाचा. | तीन वर्षे .. | थकबाकी प्रदेय होते तेव्हापासून. |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १०६ | मृत्युपत्रकर्त्याने मृत्युपत्राद्वारे दिलेल्या उत्तरदानाकरिता किंवा अवशिष्टाच्या हिश्श्याकरता अथवा विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीतील आपल्या वाटणीच्या हिश्श्याकरता मृत्युपत्रव्यवस्थापकाविरुद्ध किंवा प्रशासकाविरुद्ध किंवा संपदेचे वितरण करण्याच्या कामाची जबाबदारी विधित: जिच्यावर असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीविरुद्ध. | बारा वर्षे .. | उत्तरदान किंवा हिस्सा प्रदेय किंवा सुपूर्दगीयोग्य होतो तेव्हापासून. |
| १०७ | वंशपरंपरा पदाच्या कब्जाकरता .. <br>*स्पष्टीकरण.*—वंशपरंपरा पदाशी संलग्न असलेल्या संपत्ती सर्वसाधारणपणे जेव्हा स्वीकारल्या जातात किंवा (संपत्ती नसल्यास) जेव्हा त्यासंबंधीची कर्तव्ये सर्वसाधारणपणे पार पाडली जातात तेव्हा त्या पदाचा कब्जा घेतला गेला असे होते. | बारा वर्षे .. | वादीला विरोधून प्रतिवादी पदाचा कब्जा घेतो तेव्हापासून. |
| १०८ | एखाद्या हिंदू किंवा मुस्लिम स्त्रीने जमिनीचे हस्तांतरण केले असता त्यासंबंधी दावा लावायचा झाल्यास, दावा लावण्याच्या दिनांकास ती स्त्री मृत्यू पावली असती तर जो हिंदू किंवा मुस्लिम जमिनीचा कब्जा घेण्यास हक्कदार झाला असता त्याने असे हस्तांतरण त्या स्त्रीच्या हयातीचा काळ किंवा तिचा पुनर्विवाह होईपर्यंतचा काळ खेरीज करून एरव्ही रद्दबादल ठरवून घेण्यासाठी लावावयाचा. | बारा वर्षे .. | हस्तांतरणाच्या दिनांकापासून. |
| १०९ | मिताक्षरा कायद्याने नियंत्रित होणाऱ्या एखाद्या हिंदू व्यक्तीच्या बापाने वडिलोपार्जित संपत्तीचे हस्तांतरण केले असता ते अपास्त करण्यासाठी त्या व्यक्तीने लावावयाचा. | बारा वर्षे .. | हस्तांतरिती संपत्तीचा कब्जा घेतो तेव्हापासून. |
| ११० | एकत्र कुटुंबाच्या संपत्तीपासून अपवर्जित करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यातील हिस्सा घेण्याचा हक्क बजावण्यासाठी लावावयाचा. | बारा वर्षे .. | आपणास अपवर्जित केल्याचे वादीला कळते तेव्हापासून. |
| १११ | कोणत्याही सार्वजनिक रस्त्यातून किंवा मार्गातून किंवा त्याच्या कोणत्याही भागातून एखाद्या स्थानिक प्राधिकरणाला बेकब्जा करण्यात आले असता किंवा त्याने तो कब्जा सोडून दिला असता, त्या प्राधिकरणाने किंवा त्याच्या वतीने त्याच्या कब्जासाठी लावावयाचा. | तीस वर्षे .. | बेकब्जा झाल्याच्या किंवा कब्जा सोडून दिल्याच्या दिनांकापासून. |
| ११२ | केंद्र शासनाने किंवा त्याच्या वतीने अथवा जम्मू व काश्मीर राज्याचे शासन धरून कोणत्याही राज्य शासनाने लावावयाचा कोणताही दावा (सर्वोच्च न्यायालय आपली मूळ अधिकारिता वापरत असता त्याच्यापुढे असलेला दावा खेरीज करून). | तीस वर्षे .. | खाजगी व्यक्तीने असाच दावा लावला असता तर या अधिनियमान्वये तिच्याविरुद्ध मुदत मर्यादा जेव्हा सुरू झाली असती तेव्हापासून. |

**भाग दहा—ज्यांकरता विहित कालावधी नाही असे दावे**

| | | | |
|---|---|---|---|
| ११३ | ज्याकरता या अनुसूचीत अन्यत्र कोठेही मुदत मर्यादा उपबंधित केलेली नाही असा कोणताही दावा. | तीन वर्षे .. | दावा लावण्याचा अधिकार प्रोद्भूत होतो तेव्हापासून. |

## दुसरा विभाग—अपिले

| अनुक्रमांक (१) | अपिलाचे वर्णन (२) | मुदत मर्यादा (३) | मुदत जेव्हापासून सुरू होते ती वेळ (४) |
|---|---|---|---|
| ११४ | (क) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) कलम ४१७ च्या *पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये, | नव्वद दिवस | ज्यावर अपील करावयाचे त्या आदेशाच्या दिनांकापासून. |
| | (ख) त्या संहितेच्या कलम ४१७ च्या **पोट-कलम (३) अन्वये, दोषमुक्ततेच्या आदेशावर अपील. | तीस दिवस | विशेष अनुज्ञा दिल्याच्या दिनांकापासून. |
| ११५ | (क) सत्र न्यायालयाने किंवा आपली मूळ फौजदारी अधिकारिता वापरत असता उच्च न्यायालयाने दिलेल्या मृत्यूच्या शिक्षादेशावर, | तीस दिवस | शिक्षादेशाच्या दिनांकापासून. |
| | (ख) अन्य कोणत्याही शिक्षादेशावर किंवा दोषमुक्ततेचा आदेश सोडून अन्य कोणत्याही आदेशावर— | | |
| | (एक) उच्च न्यायालयाकडे; .. | साठ दिवस | शिक्षादेशाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |
| | (दोन) अन्य कोणत्याही न्यायालयाकडे, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' †(१८९८ चा ५) याअन्वये. | तीस दिवस | शिक्षादेशाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |
| ११६ | (क) कोणत्याही हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर एखाद्या उच्च न्यायालयाकडे; | नव्वद दिवस | हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |
| | (ख) कोणत्याही हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर अन्य कोणत्याही न्यायालयाकडे, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याअन्वये. | तीस दिवस | हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |
| ११७ | कोणत्याही उच्च न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर त्याच न्यायालयाकडे अपील. | तीस दिवस | हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |

## तिसरा विभाग—अर्ज

| अनुक्रमांक (१) | अर्जाचे वर्णन (२) | मुदत मर्यादा (३) | मुदत जेव्हापासून सुरू होते ती वेळ (४) |
|---|---|---|---|
| | **भाग एक—विनिर्दिष्ट प्रकरणांतील अर्ज** | | |
| ११८ | संक्षिप्त प्रक्रियेखालील दाव्यात उपस्थित होऊन बचाव देण्याच्या अनुज्ञेसाठी. | दहा दिवस | समन्स बजावण्यात येते तेव्हापासून. |
| ११९ | (क) न्यायालयात लवाद-निवाडा दाखल करण्यासाठी; | तीस दिवस | लवाद-निवाडा केल्याबाबतची नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून. |
| | (ख) लवाद-निवाडा अपास्त करण्यासाठी किंवा लवाद-निवाडा पुनर्विचारार्थ पाठविण्यासाठी. 'लवाद अधिनियम, १९४०' (१९४० चा १०) याअन्वये अर्ज. | तीस दिवस | लवाद-निवाडा दाखल करण्याबाबतची नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून. |
| १२० | मृत वादीच्या किंवा अपीलकर्त्याच्या अथवा मृत प्रतिवादीच्या किंवा उत्तरवादीच्या वैध प्रतिनिधीला पक्षकार म्हणून सामील करून घेण्याकरिता 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याअन्वये. | नव्वद दिवस | वादीच्या, अपीलकर्त्याच्या, प्रतिवादीच्या किंवा, प्रकरणपरत्वे, उत्तरवादीच्या मृत्यूच्या दिनांकापासून. |

* आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३', कलम ३७८, पोट-कलमे (१) व (२) पहा.
** आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३', कलम ३७८, पोट-कलम (३) पहा.
† आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) पहा.

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १२१ | दावावसान अपास्त करण्याचा आदेश मिळवण्यासाठी त्याच संहिते अन्वये अर्ज. | साठ दिवस | दावावसानाच्या दिनांकापासून. |
| १२२ | उपस्थित न राहिल्यामुळे किंवा अर्ज पुढे न चालवल्यामुळे अथवा आदेशिकेच्या बजावणीचा खर्च देण्यास किंवा खर्चाबद्दल प्रतिभूती सादर करण्यास चुकल्यामुळे खारीज करण्यात आलेला दावा किंवा अपील किंवा अर्ज पुर्नविलोकनार्थ किंवा पुनरीक्षणार्थ परत दाखल करण्याकरता. | तीस दिवस | खारीज करण्यात आल्याच्या दिनांकापासून. |
| १२३ | एकतर्फी केलेला हुकूमनामा अपास्त करण्याकरता अथवा ज्या अपिलात एकतर्फी हुकूमनामा करण्यात आला किंवा एकतर्फी सुनावणी करण्यात आली त्याची फेरसुनावणी करण्याकरता.<br>**स्पष्टीकरण.**—या अनुच्छेदाच्या प्रयोजनार्थ, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) आदेश पाच, नियम २० खालील बदली बजावणी ही रीतसर बजावणी असल्याचे मानले जाणार नाही. | तीस दिवस | हुकूमनाम्याच्या दिनांकापासून अथवा समन्स किंवा नोटीस रीतसर बजावण्यात आली असेल तर, जेव्हा अर्जदाराला हुकूमनामा माहीत होतो त्या दिनांकापासून. |
| १२४ | सर्वोच्च न्यायालयाहून अन्य न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाच्या पुनर्विलोकनाकरता. | तीस दिवस | हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |
| १२५ | हुकूमनाम्याच्या समायोजनाची किंवा पूर्तीची नोंद करण्याकरता. | तीस दिवस | भरणा किंवा समायोजन केले जाते तेव्हापासून. |
| १२६ | हुकूमनाम्याची रक्कम हप्त्याहप्त्यांनी देण्याकरता. | तीस दिवस | हुकूमनाम्याच्या दिनांकापासून. |
| १२७ | हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीत झाली विक्री अपास्त करण्याकरता करावयाचा अर्ज—निर्णीत ऋणकोने करावयाचा असा अर्ज धरून. | [1][साठ दिवस] | विक्रीच्या दिनांकापासून. |
| १२८ | एखाद्या व्यक्तीकडून स्थावर संपत्तीचा कब्जा काढून घेण्यात आला असून, हुकूमनामाधारकाच्या अथवा दरखास्त-कार्यवाहीत झालेल्या विक्रीतील खरेदीदाराच्या हक्काला तिची हरकत असेल तेव्हा, त्या व्यक्तीने कब्जासाठी करावयाचा. | तीस दिवस | बेकब्जा करण्यात आल्याच्या दिनांकापासून. |

१. १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४, कलम ९८ (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

*वरील अधिनियमाचे—कलम ९८ (२) पुढीलप्रमाणे आहे :—

'मुदत अधिनियम, १९६३' च्या अनुसूचीतील अनुच्छेद १२७ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी या अधिनियमाच्या प्रारंभ-दिनांकी किंवा त्यापूर्वी संपला असेल त्या बाबतीत, सदर अनुच्छेदात उल्लेखिलेला अर्ज, केवळ पोट-कलम (१) मधील उपबंधांन्वये त्या अधिनियमात त्याहून दीर्घ मुदतीची तरतूद केली आहे एवढ्याच कारणास्तव, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर दाखल करणे शक्य होईल अशा प्रकारे त्याचा अर्थ लावला जाणार नाही.

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १२९ | ज्या संपत्तीबाबत हुकूमनामा झाला किंवा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीत जी विकली गेली अशा स्थावर संपत्तीचा कब्जा सुपूर्द करण्यास झालेला प्रतिकार किंवा अडथळा दूर केल्यानंतर कब्जाकरता. | तीस दिवस | प्रतिकाराच्या किंवा अडथळयाच्या दिनांकापासून. |
| १३० | नादार म्हणून अपील करण्याच्या अनुज्ञेकरता— | | |
| | (क) उच्च न्यायालयाकडे .. | साठ दिवस | ज्यावर अपील करावयाचे त्या हुकूमनाम्याच्या दिनांकापासून. |
| | (ख) अन्य कोणत्याही न्यायालयाकडे .. | तीस दिवस | ज्यावर अपील करावयाचे त्या हुकूमनाम्याच्या दिनांकापासून. |
| १३१ | 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) किंवा *'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याखाली एखाद्या न्यायालयाने आपले पुनरीक्षणाचे अधिकार वापरावेत याकरता. | नव्वद दिवस | ज्याचे पुनरीक्षण व्हावे अशी मागणी असेल त्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |
| १३२ | संविधानाच्या अनुच्छेद १३२ चा खंड (१), किंवा अनुच्छेद १३३, किंवा अनुच्छेद १३४ च्या खंड (१) चा उपखंड (ग) याखाली अथवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्यायोग्य असल्याचे प्रमाणपत्र मिळवण्याकरता उच्च न्यायालयाकडे. | साठ दिवस | हुकूमनामा, आदेश किंवा शिक्षादेश यांच्या दिनांकापासून. |
| १३३ | पुढील प्रकरणी अपील करण्याच्या विशेष अनुज्ञेकरता सर्वोच्च न्यायालयाकडे— | | |
| | (क) मृत्यूचा शिक्षादेश अंतर्भूत असणाऱ्या प्रकरणात; | साठ दिवस | न्यायनिर्णय, अंतिम आदेश किंवा शिक्षादेश यांच्या दिनांकापासून. |
| | (ख) अपील करण्याची अनुज्ञा उच्च न्यायालयाने नाकारली असेल अशा प्रकरणात; | साठ दिवस | नकाराच्या आदेशाच्या दिनांकापासून. |
| | (ग) अन्य कोणत्याही प्रकरणात .. | नव्वद दिवस | न्यायनिर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून. |
| १३४ | हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीत झालेल्या विक्रीतील स्थावर संपत्तीच्या खरेदीदाराने कब्जा मिळवण्याकरता करावयाचा. | एक वर्ष .. | विक्री कायम होते तेव्हापासून. |
| १३५ | करणार्थी व्यादेश देणारा हुकूमनामा बजावून घेण्याकरता. | तीन वर्षे .. | हुकूमनाम्याच्या दिनांकापासून किंवा पालनाकरता दिनांक निश्चित करण्यात आला असेल तर, अशा दिनांकापासून. |

*आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) पहा.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १३६ | कोणत्याही दिवाणी न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या (करणार्थी व्यादेश देणाऱ्या हुकूमनाम्याहून अन्य) किंवा आदेशाच्या अंमलबजावणीकरता. | बारा वर्षे .. | [1][जेव्हा] हुकूमनामा किंवा आदेश बजावणीयोग्य होतो तेव्हापासून, अथवा विवक्षित दिवशी किंवा वेळोवेळी पैशाचा भरणा किंवा कोणत्याही मालमत्तेची सुपूर्दगी करावी असे हुकूमनाम्याने किंवा नंतरच्या कोणत्याही आदेशाने निर्देशित केले असेल तर, ज्यासंबंधी अंमलबजावणी करण्याची मागणी असेल तो भरणा किंवा ती सुपूर्दगी करण्यात कसूर होते तेव्हापासून : परंतु कायम व्यादेश देणारा हुकूमनामा बजावून घेण्यासाठी किंवा त्याच्या अंमलबजावणीसाठी केलेला अर्ज कोणत्याही मुदतमर्यादेस अधीन असणार नाही. |

### भाग दोन—अन्य अर्ज

| | | | |
|---|---|---|---|
| १३७ | ज्याकरता या भागात अन्यत्र कोठेही मुदत-मर्यादा उपबंधित केलेली नसेल असा अन्य कोणताही अर्ज. | तीन वर्षे .. | अर्ज करण्याचा अधिकार उपार्जित होतो तेव्हापासून. |

[1] १९६४च्या अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ व दुसऱ्या अनुसूचीद्वारे "जेव्हा" या मजकुराऐवजी समाविष्ट केले.

# मुदत अधिनियम, १९६३

# THE LIMITATION ACT, 1963

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अखंडपणे .. | without interruption .. | [क. २५(१)] |
| अग्रक्रय हक्क .. | right of pre-emption .. | [अनुसूची-९७] |
| अटकाव .. | obstruction .. | [क. २५-स्पष्टी.] |
| अधिकारितेतील उणीव .. | defect of jurisdiction .. | [क. १४(१)] |
| अधिवासी .. | domiciled .. | [क. ११(२)(ख)] |
| अनुतोष .. | relief .. | [क. १४(२)] |
| अनुसेवी स्थावर .. | servient tenement .. | [क. २६] |
| अन्य प्रयोजनांसाठी दुरुपयोग करणे .. | prevert to other purposes .. | [अनुसूची-८४] |
| अन्यवर्ती विशेष हक्क .. | exclusive privilege .. | [अनुसूची-८८] |
| अपकृती .. | tort .. | [क. २(ड)] |
| अपव्यय .. | waste .. | [अनुसूची-८९] |
| अपील करण्यास अनुज्ञा .. | leave to appeal .. | [क. १२(८)] |
| अपिलास विरोध करणे .. | resist an appeal .. | [क. १४(३) स्पष्टी. (ख)] |
| अप्रामाणिकपणे अपहार करणे .. | dishonest misappropriation .. | [अनुसूची-६८] |
| अभिग्रहण .. | seizure .. | [अनुसूची-८०] |
| अभिस्वीकृती .. | acknowledgment .. | [क. १८(१)] |
| अर्ज चालवणे .. | prosecute an application .. | [क. १३] |
| अलोपनीय .. | indefeasible .. | [क. २५(१)] |
| अवमानणे .. | dishonour .. | [अनुसूची-३९] |
| अवैध कैद .. | false imprisonment .. | [अनुसूची-७३] |
| असमर्थता .. | inability .. | [क. ९] |
| अस्तिवाची .. | affirmative .. | [क. २५(१)] |
| आगळीक झालेली व्यक्ती .. | person wronged .. | [अनुसूची-८१] |
| आबद्ध व्यक्ती .. | obligee .. | [अनुसूची-३७] |
| आबंधन .. | obligation .. | [क. २(घ)] |
| उत्तरवादी .. | respondent .. | [अनुसूची-१२०] |
| एकत्र कुटुंबाची मालमत्ता .. | joint family property .. | [क. ७-स्पष्टी. दोन] |
| एकंदर संपदा .. | general estate .. | [अनुसूची-१०३] |
| एकेरी बंधपत्र .. | single bond .. | [अनुसूची-२८] |
| कपटपूर्वक किंवा बलप्रयोगाने .. | by fraud or force .. | [क. १७-स.टी.] |
| कपटात सामील असलेला .. | party to the fraud .. | [क. १७(१)-परंतुक] |
| करणार्थी व्यादेश .. | mandatory injunction .. | [अनुसूची-१३५] |
| करवून घेणे .. | enforce .. | [अनुसूची-६२] |
| कर्जदाता .. | lender .. | [अनुसूची-२०] |
| कर्ता .. | manager .. | [अनुसूची-५०] |
| कायदेशीर पालक .. | lawful guardian .. | [क. २०(१)] |
| (–च्या) कारणे .. | on account of .. | [क. १९] |
| कारवाईयोग्य .. | actionable .. | [क. २३-स.टी.] |
| कॉपीराईट .. | copyright .. | [अनुसूची-८८] |
| खंड .. | interruption .. | [क. २५-स्पष्टी.] |
| गर्भस्थ अपत्य .. | child in the womb .. | [क. ६-स्पष्टी.] |
| गहाण फेडणे .. | satisfy a mortgage .. | [क. २(द्द)] |

| | | |
|---|---|---|
| गुंडाळणे | .. wind up | .. [क. ३(२)(क्)(तीन)] |
| गैर कब्जा | .. wrongful possession | .. [क. २(ढ्)] |
| गैरनियम किंवा अतिरेकी | .. irregular or excessive | .. [अनुसूची-७९] |
| गैरपणे | .. wrongfully | .. [अनुसूची-५१] |
| गैरपणे बळकावणे | .. wrongfully taking | .. [अनुसूची-९१(क्)] |
| चिरभोग | .. prescription | .. [क. २५-स.टी.] |
| जातीने भरणा करणे | .. personal payment | .. [अनुसूची-५३] |
| तारणग्राही | .. pawnee | .. [अनुसूची-७०] |
| थांबणे | .. discontinuance | .. [क. २५-स्पष्टी.] |
| दर्शनी प्रदेय | .. payable at sight | .. [अनुसूची-३२] |
| दर्शनोत्तर प्रदेय | .. payable after sight | .. [अनुसूची-३२] |
| दाखविण्यात आल्यावर | .. at sight | .. [क. २(ट्)] |
| दाननिधी | .. endowment | .. [अनुसूची-९६] |
| दायित्व | .. liability | .. [क. १८(१)] |
| दायित्वमुक्ती | .. discharge | .. [क. २] |
| दायित्वमुक्ती देणे | .. give discharge | .. [क. ७] |
| दावा अर्ज | .. plaint | .. [क. ३(२)(क्)(एक)] |
| दावाअर्ज सादर करणे | .. present a plaint | .. [क. ३(२)(क्)(एक)] |
| दावा परत दाखल करणे | .. restore a suit | .. [अनुसूची-१२२] |
| दावावसान | .. abatement | .. [अनुसूची-१२१] |
| दाव्यांची मुदत | .. limitation of suits | .. [पूर्ण नाव] |
| दिवाणीपात्र अपकृत्य | .. civil wrong | .. [क. २(ड्)] |
| दुरुपयोग | .. preversion | .. [अनुसूची-८४] |
| दुर्भावमूलक खटला | .. malicious prosecution | .. [अनुसूची-७४] |
| देणे | .. liability | .. [क. २०(३)(क्)] |
| दोषमुक्तता | .. acquittal | .. [अनुसूची-११४] |
| नष्ट करणे | .. extinguish | .. [क. २७] |
| नादार | .. pauper | .. [अनुसूची-१३०] |
| निमूटपणे सहन करणे | .. submit to | .. [क. २५-स्पष्टी.] |
| नियतकालाने आवर्तित होणारा हक्क | periodically recurring right | .. [अनुसूची-१०४] |
| निरपवाद | .. absolute | .. [क. २५(१)] |
| निर्णीत ऋणको | .. judgment-debtor | .. [क. १७(२)] |
| निर्णीत धनको | .. judgment-creditor | .. [क. १७(२)] |
| निर्बुद्ध | .. idiot | .. [क. ६(१)] |
| निर्वेधपणे | .. peaceably | .. [क. २५(१)] |
| निवासगृह | .. lodging house | .. [अनुसूची-८] |
| निक्षेपग्राही | .. depository | .. [अनुसूची-७०] |
| निःसमर्थता | .. disability | .. [क. ९] |
| न्यास म्हणून | .. in trust | .. [क. १०] |
| पदाच्या नात्याने | .. in official capacity | .. [अनुसूची-१००] |
| परत मिळवणे | .. recover | .. [क. १७(१)-परंतुक] |
| परस्पर, खुले व चालू खाते | .. mutual, open and current account | .. [अनुसूची-१] |
| परस्परांची देणीघेणी | .. reciprocal demands | .. [अनुसूची-१] |
| परिवाहक | .. carrier | .. [अनुसूची-१०] |
| पक्षकारांचे अपसंयोजन | .. misjoinder of parties | .. [क. १४(३)-स्पष्टी.(ग)] |

| | | |
|---|---|---|
| पांथशाला | tavern | [अनुसूची-८] |
| (अर्ज) पुढे न चालवणे | want of prosecution | [अनुसूची-१२२] |
| पुरीबंध | foreclosure | [अनुसूची-६३ (क्)] |
| (—वर) पोसले जाणे | subsist upon | [क.२] |
| प्रकथन करणे | aver | [क. १८ (२) स्पष्टी-(क्)] |
| प्रकर्ता | principal | [अनुसूची-३] |
| प्रचालनाची नोटीस | notice of motion | [क. ३ (२) (ग्)] |
| प्रतिकथन करणे | plead | [क. ३ (२) (ख्) (एक)] |
| प्रतिमागणी | counter claim | [क. ३ (२) (ख्)] |
| प्रतिसाक्षन | protest | [अनुसूची-३९] |
| प्रत्यक्ष कब्जा | physical possession | [अनुसूची-९७] |
| प्रत्यावर्तभोगी | reversioner | [अनुसूची-६५-स्पष्टी. (क्)] |
| प्रथा | practice | [क. ५-स्पष्टी] |
| प्रदेयी | payee | [अनुसूची-३७] |
| प्रलंबित दावे | pending suits | [क. ३१-स.टी.] |
| प्रवृत्त करणे | induce | [अनुसूची-७८] |
| प्रवेश | access | [क. २५ (१)] |
| प्रारंभिक न्यायालय | court of first instance | ]क. १४ (२)] |
| फूस लावून नेणे | seduction | [अनुसूची-७७] |
| बचावात तक्रार मांडणे | set up as defence | [क. ३ (१)] |
| बजावून घेणे | enforce | [क. १७ (१)-परंतुक] |
| बदली बजावणी | substituted service | [अनुसूची-१२३-स्पष्टी.] |
| बिनशर्त बांधून घेणे | engage absolutely | [क. २ (ट्र)] |
| बेकब्जा करणे | dispossession | [अनुसूची-११] |
| भाटकदारी | tenancy | [अनुसूची-४७] |
| भ्रमिष्ट | insane | (अनुसूची-१०२] |
| (—च्या) मर्जीनुसार | at the election of | [अनुसूची-४५] |
| मागणी झाल्यावर | on demand | [क. २ (द्)] |
| मान्य करणे | admit | [अनुसूची-१] |
| मान्य झालेला हिशेब | accounts stated | [अनुसूची-२] |
| मालमत्तेचा मर्यादित मालक | limited owner of property | [क. २० (३) (क्)] |
| मुख्य ऋणको | principal debtor | [अनुसूची-४२] |
| मुचलका | recognisance | [अनुसूची-१०१] |
| मुदत चालू राहणे | running of time | [क. ९-स.टी.] |
| मुदतबाह्य दावे | barred suits | [क. ३१-स.टी.] |
| मुदत मर्यादा | period of limitation | [क. २ (अ्)] |
| मुदतीचा बाध | bar of limitation | [क. ३-स.टी.] |
| मूकसंमती देणे | acquiesce in | [क. २५-स्पष्टी.] |
| मौल्यवान प्रतिफल | valuable consideration | [(क.१०] |
| मृत्युपत्राधिकारी | devisee | [अनुसूची-६५-स्पष्टी. (क्)] |
| मृदा | soil | [क. २ (च्)] |
| मोजणे | reckon | [क. ६ (१)] |
| यथायोग्य तत्परता | due diligence | [क. १४ (१)] |
| येणे रक्कम | demand | [अनुसूची-९९] |

**मराठी-इंग्रजी शब्दसूची—चालू**

| | | |
|---|---|---|
| रद्द ठरविणे .. | set aside ... | [अनुसूची-५९] |
| राहण्याच्या सोयीबद्दलचे भाडे .. | price of lodging .. | [अनुसूची-९] |
| लवाद-निवाडा .. | award .. | [अनुसूची-९] |
| वखारिया .. | factor .. | [अनुसूची-२] |
| वचन चिठ्ठी .. | promissory note .. | [क. २(ट)] |
| वजावट .. | set-off .. | [क. १८(२)-स्पष्टी.] |
| वडिलार्जित मालमत्ता .. | ancestral property .. | [अनुसूची-१०९] |
| वाटणीचा हिस्सा .. | distributive share .. | [अनुसूची-१०६] |
| वादकारणांचे अपसंयोजन .. | misjoiner of causes of action | [क. १४(३)-स्पष्टी. (ग)] |
| वादी .. | plaintiff | [क. २(एक)] |
| विकर्षक .. | drawer | [अनुसूची-४१] |
| विक्री कायम करणे .. | confirm a sale | [अनुसूची-९९] |
| विक्रीला हरकत घेणे .. | impeach a sale | [अनुसूची-९७] |
| विदेशी विपत्र .. | foreign bill | [अनुसूची-३९] |
| विदेशी न्यायनिर्णय .. | foreign judgment .. | [अनुसूची-१०१] |
| विनंती अर्ज .. | petition .. | [क. २(ख)] |
| विनिर्दिष्ट पालन .. | specific performance | [अनुसूची-५४] |
| विपरिवर्तन .. | conversion | [अनुसूची-६८] |
| विमाकार .. | insurer .. | [अनुसूची-४४(क)] |
| विशेष अनुज्ञा .. | special leave .. | [अनुसूची-११४(ख)] |
| विशेष नुकसान .. | special damage .. | [अनुसूची-७६] |
| व्यवस्थापक .. | manager .. | [क. २०(१)] |
| शासकीय समापक .. | official liquidator .. | [क. ३(२)(क)(तीन)] |
| शेषभोगी .. | remainderman .. | [अनुसूची-६५-स्पष्टी. (क)] |
| सतत चालू राहणारा .. | continuing .. | [क. २२] |
| सहजामीनदार .. | co-surety .. | [क. ४३] |
| सहहिस्सेदार .. | co-sharer .. | [अनुसूची-४८] |
| संविदाकार .. | contractors .. | [क. २०(२)] |
| सुपूर्ददार .. | committee .. | [क. २०(१)] |
| सुबुद्धता .. | sanity .. | [अनुसूची-१०२] |
| सुविधाधिकार .. | easement .. | [क. २५(१)] |
| सोयविपत्र .. | accommodation bill .. | [अनुसूची-४१] |
| स्वतःच्या लाभासाठी विनियोजन करणे | appropriation for one's own profit | [क. २(च)] |
| स्वतःला बांधून घेणे .. | oblige oneself .. | [क. (२)(घ)] |
| स्वत्वाधिकार .. | title .. | [क. २(ढ)] |
| स्वीकर्ता .. | acceptor .. | [अनुसूची-४१] |
| स्वीकारणे .. | admit .. | [क. ५] |
| हस्तांतरण .. | alienation .. | [अनुसूची-१०८] |
| हस्तांतरिती .. | alienee .. | [अनुसूची-१०९] |
| हिंदू अविभक्त कुटुंब .. | Hindu undivided family | [क. ७-स्पष्टी. दोन] |
| हुकूमनामा बजावून घेणे किंवा त्याची अंमलबजावणी करणे | enforcement or execution of a decree | [अनुसूची-१३६] |
| हुकूमनाम्याचे समायोजन .. | adjustment of decree .. | [अनुसूची-१२५] |
| हुकूमनाम्याची पूर्ती .. | satisfaction of decree .. | [अनुसूची-१२५] |

# THE LIMITATION ACT, 1963

# मुदत अधिनियम, १९६३

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abatement | दावावसान | [Sch. 121] |
| absolute | निरपवाद | [S. 25(*1*)] |
| acceptor | स्वीकर्ता | [Sch. 41] |
| access | प्रवेश | [S. 25(*1*)] |
| accommodation bill | सोयविपत्र | [Sch. 41] |
| accounts stated | मान्य झालेला हिशेब | [Sch. 26] |
| acknowledgment | अभिस्वीकृती | [S. 18(*1*)] |
| acquiesce in | मूकसंमती देणे | [S. 25-Expl.] |
| acquittal | दोषमुक्तता | [Sch. 114] |
| actionable | कारवाईयोग्य | [S. 23 m.n.] |
| adjustment of decree | हुकूमनाम्याचे समायोजन | [Sch. 125] |
| admit | (१) स्वीकारणे | [S. 5] |
| | (२) मान्य करणे | [Sch. 1] |
| adverse possession | विरुद्ध कब्जा | [Sch. 65-Expl. (*a*)] |
| affirmative | अस्तित्वाची | [S. 25 (*1*)] |
| alienation | हस्तांतरण | [Sch. 108] |
| alienee | हस्तांतरिती | [Sch. 109] |
| ancestral property | वडिलार्जित मालमत्ता | [Sch. 109] |
| appropriate for one's own profit | स्वत:च्या लाभासाठी विनियोजित करणे | [S. 2(*f*)] |
| at sight | दाखविण्यात आल्यावर | [S. 2(*k*)] |
| at the election of | (—च्या) मर्जीनुसार | [Sch. 45] |
| aver | प्रकथन करणे | [S. 18(*2*)-Expl. (*a*)] |
| avoid | शून्य करणे | [Sch. 45] |
| award | लवाद-निवाडा | [Sch. 119] |
| barred suits | मुदतबाह्य दावे | [S. 31 m.n.] |
| bar of limitation | मुदतीचा बाधा | [S. 3 m.n.] |
| by fraud or force | कपटपूर्वक किंवा बलप्रयोगाने | [S. 17(*2*)] |
| carrier | परिवाहक | [Sch. 10] |
| child in the womb | गर्भस्थ अपत्य | [S. 6-Expl.] |
| civil wrong | दिवाणीपात्र अपकृत्य | [S. 2(*m*)] |
| committee | सुपूर्ददार | [S. 20(*1*)] |
| confirm a sale | विक्री कायम करणे | [Sch. 99] |
| contingency | संभावी घटना | [Sch. 27] |
| continuing | सतत चालू राहणारा | [S. 22] |
| contractors | संविदाकार | [S. 20(*2*)] |
| conversion | विपरिवर्तन | [Sch. 68] |
| copyright | कॉपीराईट | [Sch. 88] |
| co-sharer | सह हिस्सेदार | [Sch. 84] |
| co-surety | सह जामीनदार | [Sch.43] |
| co-trustee | सह विश्वस्त | [Sch.49] |
| counter-claim | प्रतिमागणी | [S. 3(*2*)(*b*)] |
| court of first instance | प्रारंभिक न्यायालय | [S. 14(*2*)] |
| defect of jurisdiction | अधिकारितेतील उणीव | [S. 14(*1*)] |

| | | |
|---|---|---|
| demand | येणे रक्कम | [Sch. 99] |
| depositary | निक्षेपग्राही | [Sch. 70] |
| determine | समाप्त करणे | [Sch. 67] |
| devisee | मृत्युपत्राधिकारी | [Sch. 65-Expl. (*a*)] |
| disability | नि:समर्थता | [S. 9] |
| discharge | दायित्वमुक्ती | [S. 7] |
| dishonest misappropriation | अप्रामाणिकपणे अपहार करणे | [Sch. 68] |
| dispossession | बेकब्जा करणे | [Sch. 111] |
| distributive share | वाटणीचा हिस्सा | [Sch. 106] |
| domiciled | अधिवासी | [S. 11(*2*)(*b*)] |
| drawer | विकर्षक | [Sch. 41] |
| easement | सुविधाकार | [S. 25(*1*)] |
| endowment | दाननिधी | [Sch. 96] |
| enforce | (१) करवून घेणे | [Sch. 62] |
| | (२) बजावून घेणे | [S. 17(*1*) proviso] |
| enforcement or execution of a decree | हुकूमनामा बजावून घेणे किंवा त्याची अंमलबजावणी करणे. | [Sch. 136] |
| engage absolutely | बिनशर्त बांधून घेणे | [S. 2(*k*)] |
| exclusive privilege | अन्यवर्जी विशेष हक्क | [Sch. 88] |
| factor | वखारिया | [Sch. 2] |
| false imprisonment | अवैध कैद | [Sch. 73] |
| foreclosure | पुरोबंध | [Sch. 63(*a*)] |
| foreign bill | विदेशी विपत्र | [Sch. 39] |
| foreign judgment | विदेशी न्यायनिर्णय | [Sch. 101] |
| general estate | एकंदर संपदा | [Sch. 103] |
| give discharge | दायित्वमुक्ती देणे | [S. 7] |
| good faith | सद्भाव | [S. 2(*h*)] |
| Hindu undivided family | हिंदू अविभक्त कुटुंब | [S. 7, Expl. II] |
| idiot | निर्बुद्ध | [S. 6(*1*)] |
| irregular or excessive | गैरनियम किंवा अतिरेकी | [Sch. 79] |
| impeach a sale | विक्रीला हरकत घेणे | [Sch. 97] |
| inability | असमर्थता | [S. 9] |
| indefeasible | अलोपनीय | [S. 25(*1*)] |
| insane | भ्रमिष्ट | [Sch. 102] |
| insurer | विमाकार | [Sch. 44(*a*)] |
| interruption | खंड | [S. 25, Expl.] |
| joint family property | एकत्र कुटुंबाची मालमत्ता | [S. 7, Expl. II] |
| judgment-creditor | निर्णीत धनको | [S. 17 (*2*)] |
| judgment-debtor | निर्णीत ऋणको | [S. 17(*2*)] |
| leave to appeal | अपील करण्यास अनुज्ञा | [S. 12 (*5*)] |
| lender | कर्जदाता | [Sch.2 0] |
| limitation of suits | दाव्यांची मुदत | [Long title] |
| limited owner of property | मालमत्तेचा मर्यादित मालक | [S. 20(*3*)(*a*)] |
| lodging house | निवासगृह | [Sch.8] |
| malicious prosecution | दुर्भावमूलक खटला | [Sch. 74] |
| manager | (१) व्यवस्थापक | [S. 20(*1*)] |
| | (२) कर्ता | [Sch.50] |

| | | |
|---|---|---|
| mandatory injunction | करणार्थी व्यादेश | [Sch. 135] |
| matter in issue | वादग्रस्त बाब | [S. 14 (*1*)] |
| misjoinder of causes of **action** | वादकारणांचे उपसंयोजन | [S. 14(*3*), Expl. (*c*)] |
| misjoinder of parties | पक्षकारांचे अपसंयोजन | [S. 14(*3*) Expl. (*c*)] |
| mutual, open and current **account** | परस्पर, खुले व चालू खाते | [Sch. 1] |
| negative | नास्तिवाची | [S. 25(*1*)] |
| notice of motion | चालनाची नोटीस | [S. 3 (*2*)(*c*)] |
| obligation | आबंधन | [S. 2 (*d*)] |
| oblige oneself | स्वत:ला बांधून घेणे | [S. 2 (*d*)] |
| obligee | आबद्ध व्यक्ती | [Sch. 37] |
| obstruction | अटकाव | [S. 25, *Expl.*] |
| official liquidator | शासकीय समापक | [S. 3 (2) (*a*) (*iii*)] |
| on account of | (–च्या) कारणे | [S. 19] |
| on demand | मागणी झाल्यावर | [S. 2 (*k*)] |
| party to the fraud | कपटात सामील असलेला | [S. 17 (*1*) proviso(*i*)] |
| pauper | नादार | [Sch. 130] |
| pawnee | तारणग्राही | [Sch. 70] |
| payable after sight | दर्शनोत्तर प्रदेय | [Sch. 32] |
| payable at sight | दर्शनी प्रदेय | [Sch. 32] |
| payee | प्रदेयी | [Sch. 37] |
| peaceably | निर्वेधपणे | [Sch. 25 (*1*)] |
| periodically recurring **right** | नियतकालाने आवर्तित **होणारा हक्क** | [Sch. 104] |
| period of limitation | मुदतमर्यादा | [S. 2 (*j*)] |
| personal payment | जातीने भरणा करणे | [Sch. 53] |
| person wronged | आगळीक झालेली व्यक्ती | [Sch. 81] |
| perversion | दुरुपयोग | [Sch. 84] |
| pervert to other purposes | अन्य प्रयोजनांसाठी दुरुपयोग **करणे** | [Sch. 84] |
| petition | विनंतीअर्ज | [S. 2 (*b*)] |
| physical possession | प्रत्यक्ष कब्जा | [Sch. 97] |
| plaint | दावाअर्ज | [S. 3(2)(*a*) (*i*)] |
| plead | प्रतिकथन करणे | [S. 3(*2*)(*d*)(*i*)] |
| prescribed period | विहित कालावधी | [S. 2(*i*)] |
| prescription | चिरभोग | [S. 25 m.n.] |
| present a plaint | दावाअर्ज सादर करणे | [S. 3(2)(*a*)(i)] |
| price of lodging | राहण्याच्या सोयीबद्दलचे **भाडे** | [Sch. 9] |
| principal | प्रकर्ता | [Sch. 3] |
| principal debtor | मुख्य ऋणको | [Sch. 42] |
| promissory note | वचनचिट्ठी | [S. 2 (*k*)] |
| prosecute an application | अर्ज चालवणे | [S. 13] |
| protest | प्रतिसाक्षन | [Sch. 39] |
| reciprocal demands | परस्परांची देणीघेणी | [Sch. 1] |
| recission of a contract | संविदेचे विखंडन | [Sch. 59] |
| reckon | मोजणे | [S. 6(*1*)] |
| recognisance | मुचलका | [Sch. 101] |
| recover | परत मिळवणे | [S. 17 (*1*) proviso] |
| redeem | बिमोचित करणे | [Sch. 61(*a*)] |

## इंग्रजी-मराठी शब्दसूची—समाप्त

| | | |
|---|---|---|
| relief | .. अनुतोष | .. [S. 14 (2)] |
| remainderman | .. शेषभोगी | .. [Sch. 65, Expl.-(*a*)] |
| resist on appeal | .. अपिलांस विरोध करणे | .. [S. 14(3) Expl.-(*b*)] |
| respondent | .. उत्तरवादी | .. [Sch. 120] |
| restore a suit | .. दावा परत दाखल करणे | .. [Sch. 122] |
| reversioner | .. प्रत्यावर्तभोगी | .. [Sch. 65, Expl.(*a*)] |
| right of pre-emption | .. अग्रक्रयहक्क | .. [Sch. 97] |
| running of time | .. मुदत चालू राहणे | .. [S. 9 m.n.] |
| sanity | .. सुबुद्धता | .. [Sch. 102] |
| satisfaction of decree | .. हुकूमनाम्याची पूर्ती | .. [Sch. 125] |
| satisfy a mortgage | .. गहाण फेडणे | .. [S. 2, (*n*)] |
| seduction | .. फूस लावून नेणे | .. [Sch. 77] |
| seizure | .. अभिग्रहण | .. [Sch. 80] |
| servient tenement | .. अनुसेवी स्थावर | .. [S. 26] |
| set aside | .. रद्द ठरवणे | .. [Sch. 59] |
| set-off | .. वजावट | .. [S. 18 (2), Expl. (*a*)] |
| set up as a defence | .. बचावात तक्रार मांडणे | .. [S. 3(*1*)] |
| sharer | .. हिस्सेदार | .. [Sch. 48] |
| single bond | .. एकेरी बंधपत्र | .. [Sch. 28] |
| soil | .. मृदा | .. [S. 2(*f*)] |
| special damage | .. विशेष नुकसान | .. [Sch. 76] |
| special leave | .. विशेष अनुज्ञा | .. [Sch. 114 (*b*)] |
| specific performance | .. विनिर्दिष्ट पालन | .. [Sch. 54] |
| submit to | .. निमूटपणे सहन करणे | .. [S. 25 Expl.] |
| subsist upon | .. (—वर) पोसले जाणे | .. [S. 2(*f*)] |
| substituted service | .. बदली बजावणी | .. [Sch. 123 Expl.] |
| tavern | .. पांथशाला | .. [Sch. 8] |
| the assured | .. बिमेदार | .. [Sch. 45] |
| title | .. स्वत्वाधिकार | .. [S. 2 (*n*)] |
| tort | .. अपकृती | .. [S. 2 (*m*)] |
| valuable consideration | .. मूल्यवान् प्रतिफल | .. [S. 10] |
| waive | .. हक्कवर्जन | .. [Sch. 37] |
| waiver | .. हक्कवर्जन करणे | .. [Sch. 37] |
| want of prosecution | .. पुढे न चालवणे | .. [Sch. 122] |
| waste | .. अपव्यय | .. [Sch. 89] |
| wind up | .. गुंडाळणे | .. [S. 3(*2*)(*a*)(*iii*)] |
| without interruption | .. अखंडपणे | .. [S. 25(*1*)] |
| wrong | .. अपकृत्य | .. [S. 2(*m*)] |
| wrongfully | .. गैरपणे | .. [Sch. 51] |
| worngfully taking | .. गैरपणे बळकावणे | .. [Sch. 91 (*a*)] |
| wrongful possession | .. गैर कब्जा | .. [S. 2 (*n*)] |